उत्कृष्ट क्वालिटी
जिरे २८०/- रु. किलो
सागर ड्रायफ्रुट
पत्ता : व्ही.के.चौधरी मार्केट, हॉटेल शेरे पंजाब समोर, पाचकंदिल, धुळे (मो.९३७११९२०००)


# आपला महाराष्ट्र

मूल्य २.००

संस्थापक - लोकमित्र भाई मदाने

WWW.APLAMAHARASHTRA.IN

संयुक्त वर्ष ६९ ■ अंक क्र.२०४ ■ सोमवार २७ एप्रिल २०२६ ■ धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक आवृत्ती ■ पाने ४

POST REGD.No./DHL/53/24-26

बॉम्बे चष्माघर
गल्ली नं.५, पारोळारोड कॉर्नर, धुळे
फोन : 235222, मो.9021853108

## एक मे पासून आपली बस-आपली सेवा प्रवासी सेवेला नवी दिशा : मंत्री सरनाईक

**मुंबई, दि.२६- जनजीवनाशी नाळ जोडलेली लालपरी आता नव्या उमेदीने, नव्या शिस्तीने आणि नव्या संवेदनशीलतेने प्रवासाला सज्ज होत आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने आपली बस-आपली सेवा, या व्यापक अभियानाच्या माध्यमातून प्रवासी सेवेला एक नवी दिशा देण्याचा संकल्प केला आहे. या उपक्रमाची घोषणा राज्याचे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केली आहे.**



मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, एसटी बसेसची संख्या वाढत असली, तरी प्रवासीसंख्या आणि महसूल अपेक्षेप्रमाणे वाढत नसल्याची जाणीव महामंडळाने गांभीर्याने घेतली आहे. याच जाणिवेतून प्रवाशांचा विश्वास पुन्हा दृढ करण्यासाठी आणि सेवेला मानवी स्पर्श देण्यासाठी हे अभियान राबविण्यात येणार आहे. एक मे पासून राज्यभर राबविण्यात येणारे हे अभियान केवळ सेवा सुधारण्याचा उपक्रम नाही. तर, एसटी आणि प्रवासी यांच्यातील विश्वासाचा नवा सेतू ठरणार आहे. लालपरीच्या चाकांना आता केवळ वेग नाही, तर संवेदनशीलतेचीही दिशा मिळणार आहे. आपली बस-आपली सेवा, हा मंत्र प्रत्यक्षात उतरला तर प्रत्येक प्रवास हा केवळ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याचा मार्ग न राहता एक सुखद, सन्मानपूर्वक आणि समाधानकारक (पान ४ वर)

## जेवणावळीतील गोळीबार माथेफिरूचे कृत्य : ट्रम्प

नवी दिल्ली, दि.२६- वॉशिंग्टन डीसी येथे व्हाईट हाऊस कॉरस्पॉन्डंट्स असोसिएशनच्या डिनर कार्यक्रमात अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या उपस्थितीत झालेल्या गोळीबाराच्या घटनेने जगभरात खळबळ उडाली आहे. या घटनेनंतर ट्रम्प यांनी तातडीने पत्रकार परिषद घेऊन सुरक्षा यंत्रणांची माहिती दिली. विशेषत: इराणसोबत सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर हा हल्ला इराणने घडवून आणला का? असा प्रश्न विचारला असता ट्रम्प यांनी सध्यातरी अशी कोणतीही शक्यता नसल्याचे स्पष्ट केले. पत्रकारांनी जेव्हा ट्रम्प यांना विचारले की, या हल्ल्याचा इराणशी काही संबंध आहे का? तेव्हा ट्रम्प म्हणाले, सुरुवातीच्या माहितीनुसार तसे दिसत नाही. हा (पान ४ वर)

## स्वयंपाकी पाठवत भोंदू अशोक खरातचा भांडाफोड सीए ललित पोफळेंचा फार्म हाऊसमध्ये मास्टर प्लॅन

**नाशिक, दि.२६- महिलांच्या लैंगिक शोषण प्रकरणात अटकेत असलेल्या भोंदू अशोक खरात याच्याविरोधात आणखी एक फसवणुकीचा गुन्हा नाशिकच्या सरकारवाडा पोलिस ठाण्यात दाखल झाला आहे. खरातच्या विरोधात दाखल झालेला हा गुन्हा मास्टरस्ट्रोक ठरला आहे. या प्रकरणात फिर्यादीने चक्क गुप्तहेराप्रमाणे खरातच्या घरात स्वयंपाकी पाठवून त्याच्याकडून या भोंदूची माहिती मिळवली. एखाद्या चित्रपटाच्या कथानकाला शोभेल अशी फिर्यादीतील माहिती आहे.**




बँकिंग लोन कन्सल्टंट आणि खरातचा सीए राहिलेल्या ललित प्रकाश पोफळे यांनी खरातने आपल्याला मृत्यूयोगाची भीती दाखविली होती. तसेच शक्तीपीठ महामार्गालगत मालमत्ता खरेदीच्या आमिषातून तब्बल आठ कोटी ७६ लाखांची फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल केला आहे. यात ललित पोफळे यांनी पोलिसांना जी माहिती दिली त्यातून खरातच्या कुकर्मांच्या पुराव्यांचा पेटाराच खुला झाला आहे. ललित पोफळे याने आपल्या मर्जीतील एका तरुणास खरातकडे अनेक महिने स्वयंपाकी म्हणून नोकरीस ठेवून खरातच्या काळ्या कृत्याचा भांडाफोड केल्याचे तपासात उघड झाले आहे. खरातचे काळे कारनामे बाहेर काढण्यामागे त्याचा ऑफिसबॉय नीरज जाधव नंतर आता या स्वयंपाकीची भूमिका महत्त्वाची ठरली आहे.

खरातने त्याच्या मिरगाव येथील फार्म हाऊसवर जेवण बनवण्यासाठी स्वयंपाक्याची गरज असल्याचे ललित पोफळे यांना सांगितले होते. खरातवर त्यांना संशय आल्याने त्यांनी एखाद्या गुप्तहेराप्रमाणे आपल्या मर्जीतील एकाला स्वयंपाकी म्हणून खरातच्या फार्म हाऊसवर पाठवले. त्याचा (पान ४ वर)

## बांग्ला घुसखोर हाकलणार पंतप्रधान मोदींचे आश्वासन

कोलकता, दि.२६- पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ममता बनर्जी यांच्या सरकारवर जोरदार हल्ला चढवला. बनगाव येथील सभेत बोलताना त्यांनी घुसखोरांना थेट इशारा देत एकोणतीस एप्रिलपूर्वी बंगाल सोडा, अन्यथा चार मेनंतर कारवाई होईल असा स्पष्ट इशारा दिला. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या या सभेनंतर भाजप आणि तृणमूल काँग्रेस यांच्यातील संघर्ष अधिक तीव्र होण्याची चिन्हे दिसत आहेत.पंतप्रधान मोदी यांनी ममता बॅनर्जी सरकारवर घुसखोरांना आश्रय दिल्याचा आरोप केला. भाजप सत्तेत आल्यानंतर प्रत्येक घुसखोराला बाहेरचा रस्ता दाखवला जाईल, असे त्यांनी ठामपणे सांगितले. (पान ४ वर)


## फोटोग्राफीचे भीष्म रघू रॉय यांचे निधन



दिल्ली, दि.२६- भारतातील फोटोग्राफीचे भीष्म पितामह आणि आपल्या कॅमेऱ्यातून जिवंत इतिहास टिपणारे दिग्गज छायाचित्रकार रघू रॉय (वय ८३) यांचे निधन झाले. आज पहाटे नवी दिल्लीतील एका खाजगी रुग्णालयात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या पश्चात मुलगा नितीन रॉय आणि कुटुंब असा परिवार आहे. काही काळापासून ते कर्करोगाशी झुंज देत होते. कर्करोग मेंदूपर्यंत पसरल्याने त्यांची प्रकृती चिंताजनक झाली होती. रघू रॉय यांच्या निधनाने भारतीय फोटो पत्रकारितेच्या क्षेत्रातील एका सुवर्ण युगाचा अंत झाला आहे.

## शहादा तालुक्यात रस्ते, पुलांची कामे रखडली शेतकरी अन् विद्यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला

**शहादा, दि.२६ (का.प्र.)- शहादा तालुक्यातील पुलांची दुरुस्ती, नवीन पुलांचे बांधकाम आणि रस्त्यांची दुरवस्था अद्याप कायम असल्याने मे महिन्यात देखील ही कामे पूर्ण होणार का? असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. येणाऱ्या जून महिन्यापासून नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होत असून, पुलांच्या रखडलेल्या कामांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान आणि शेतकऱ्यांचा शेती हंगाम अडचणीत येण्याची दाट शक्यता आहे. प्रशासकीय दिरंगाईमुळे नागरिक संतप्त असून, पुन्हा आंदोलनाचा पवित्रा घेण्याच्या तयारीत आहेत.**



तालुक्यातील डामरखेडा येथील गोमाई नदीवरील जुन्या पुलाची दुरुस्ती आणि नवीन पुलाचे बांधकाम गेल्या तीन वर्षांपासून रखडले आहे. ठेकेदारांचा नाकर्तेपणा आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे पुलाचे काम पूर्ण होऊ शकलेले नाही. तत्कालीन जिल्हाधिकारी आणि लोकप्रतिनिधींनी वारंवार भेटी देऊनही परिस्थिती 'जैसे थे' आहे. मे महिन्याच्या अखेरपर्यंत काम पूर्ण करण्याचे आदेश देऊनही सध्याची स्थिती पाहता हे काम पूर्ण होण्याची (पान ४ वर)

## गळफास घेवून एकाची आत्महत्या

धुळे, दि.२६- साक्री तालुक्यातील राजबाई शेवाळी गावातील बेचाळीस वर्षीय इसमाने शेत शिवारातील झाडाला गळफास घेवून जीवनयात्रा संपवल्याची घटना उघडकीस आली आहे. राजबाई शेवाळी येथील भिमा हिरामण सोनवणे(वय ४२) हे म्हसदी ते कोकणी रस्त्या लगतच्या झाडाला ठिबक सिंचनच्या नळीने गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आले. परिसरातील नागरिकांच्या मदतीने खाली उतरवून रूग्णवाहिकेतून ग्रामीण रूग्णालय साक्री येथे दाखल करण्यात आले. तेथील डॉ. सुमित कुवर यांनी तपासून मयत घोषित केले. साक्री पोलीस स्टेशनला अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## महावितरणचा निर्णय रद्द करण्याची सौर ऊर्जाधारक उद्योजकांची मुख्यमंत्र्यांकडे प्रत्यक्ष भेटीद्वारे मागणी



**धुळे, दि. २६ : उद्योजकांना सौर ऊर्जेचा वापर केवळ सकाळी नऊ ते सायंकाळी पाच या वेळेतच करता येणार, असा निर्णय वीज वितरण कंपनीने घेतला आहे. वीज कंपनीच्या या निर्णयामुळे राज्यातील सर्व लघु आणि मध्यम उद्योगांपुढे मोठे संकट निर्माण झाले आहे. कंपनीच्या जाचक निर्णयामुळे उद्योगांवर आर्थिक आणि दूरगामी परिणाम होणार आहे. वन नेशन-वन ग्रीड धोरणाची मागणी होत असताना महावितरणच्या जाचक नियमामुळे इतर राज्यातील उद्योगांबरोबर स्पर्धा करणे अशक्य होईल. याबाबत राज्य सरकारने महावितरणचा नवा नियम रद्द करावा, अशी मागणी जिल्ह्यातील उद्योजकांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस काल शिरपूर येथे विविध विकास कामांच्या उद्घाटनासाठी आणि भूमीपुजनासाठी आले होते. त्यावेळी त्यांना जिल्ह्यातील लघु आणि मध्यम उद्योग असणाऱ्या उद्योजकांनी त्यांची भेट घेऊन सौर ऊर्जेचा लाभ आणि महावितरणचा नवी निर्णय याबाबत सविस्तर निवेदन दिले. (पान ४ वर)



## जिल्हा प्रशासन ई सुविधा पोर्टलचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले लोकार्पण

**धुळे, दि.२६- धुळे जिल्हा प्रशासनाने एआय आधारित तयार केलेल्या ई सुविधा पोर्टलचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शिरपूर येथील कार्यक्रमात लोकार्पण करण्यात आले.**

यावेळी धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे, महापौर मायादेवी परदेशी, आमदार अमरिशभाई पटेल, आमश्या पाडवी, राजेश पाडवी, काशीराम पावरा, मंजुळा गावित, राघवेंद्र भदाणे, अनुप अग्रवाल, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांनी धुळे जिल्हा प्रशासनाने तयार केलेल्या या पोर्टलबद्दल पालकमंत्री जयकुमार रावल, जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांचे अभिनंदन केले. धुळे जिल्हा प्रशासनाने तयार केलेल्या एआय आधारित इंजिनमुळे प्रशासनाचा कारभार गतिमान होऊन पारदर्शकता वाढेल. यामुळे लोकांची कामे सुलभ होतील, असे त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांनी या पोर्टलची माहिती देताना सांगितले की, मुख्यमंत्री महोदयांच्या १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रम, टक्के ई-गव्हर्नन्स, टीसीएच तत्त्वे, तहसील ते मंत्रालय कार्यक्षमता या दृष्टीकोनातून प्रेरणा घेऊन पालकमंत्री महोदयांच्या मार्गदर्शनाने, जिल्हाधिकारी कार्यालय यांनी ई-सुविधा हे कृत्रिम बुद्धीमत्ता आधारित जिल्हा व्यवस्थापन पोर्टल विकसित केले आहे. अशा प्रकारचा उपक्रम रबविणारा धुळे हा देशातील पहिला जिल्हा आहे.

## शहाद्यात डासांच्या प्रादुर्भावाने नागरिक त्रस्त; पालिकेतर्फे फॉगिंगद्वारे फवारणी

**शहादा, दि.२६ (का.प्र.)- उन्हाळ्याचे दिवस असताना देखील शहादा शहरात डासांचा प्रचंड प्रादुर्भाव जाणवत आहे. डासांचे प्रमाण वाढल्याने शहरात वेगवेगळ्या प्रकारचे साथीचे रोग पसरण्याची भीती निर्माण झाली आहे. कडक उन्हामुळे काही प्रमाणात डासांचे प्रमाण कमी झाले असले तरी, आरोग्य विभागातर्फे संपूर्ण शहरात फॉगिंग मशीनद्वारे औषधी फवारणी मोहीम हाती घेण्यात आली आहे.**



आतापर्यंत वेळोवेळी डास निर्मूलनासाठी औषधी फवारणी करण्यात आलेली होती, परंतु ती प्रभावीपणे आणि संपूर्ण शहरात केली न गेल्याने डासांचे प्रमाण वाढतच गेले. यामुळे शहरातील नागरिक अक्षरशः वैतागले होते. सायंकाळी व सकाळी घरात बसणेही कठीण झाले असून, रात्रभर डासांच्या त्रासामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागतो आहे. बाजारात उपलब्ध असलेली डास निर्मूलन अगरबत्ती, इलेक्ट्रिक साधने यांसारख्या उपाययोजना करूनही फरक पडत नसल्याने नागरिकांमध्ये मोठा रोष होता. विशेषतः महिलांकडून संपूर्ण शहरात, जुन्या वस्त्यांसह नवीन वसाहतींमध्ये औषधी फवारणी करण्याची मागणी वारंवार होत होती.शहरातील नवीन वसाहतींमधील रिकाम्या प्लॉटचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. अनेक ठिकाणी मोकळ्या प्लॉटमध्ये सांडपाणी सोडले जात असल्याने तिथे पाण्याची डबकी साचली आहेत. या साचलेल्या पाण्यात डासांची उत्पत्ती मोठ्या प्रमाणावर होत आहे. तसेच वाढलेल्या काटेरी झुडपांमुळेही डासांना आश्रय मिळत आहे. ही झुडपे तोडण्याची मागणी अनेक दिवसांपासून प्रलंबित होती. नवनिर्वाचित आरोग्य सभापती सुनील काशिनाथ पाटील यांनी याची दखल घेऊन तातडीने फवारणी सुरू केली आहे. नगरपालिका आरोग्य विभागातर्फे प्रत्येक प्रभागात फॉगिंग मशीनद्वारे औषधी फवारणी केली जात आहे. विशेषतः सायंकाळी सहा वाजेनंतर ही फवारणी होत असल्याने ती अधिक प्रभावी ठरेल. नागरिकांचे आरोग्य (पान ४ वर)



## नंदुरबारचा पारा चौरेचाळीस अंशावर जिल्ह्यात उष्माघात कक्षांची उभारणी

**नंदुरबार, दि.२६ (प्रतिनिधी)- जिल्ह्यात उन्हाचा तडाखा तीव्र झाला असून गेल्या ३ दिवसापासून तापमानाचा पारा ४३ अंश सेल्सिअसवर पोहोचला आहे. वाढत्या उष्णतेमुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन आरोग्य विभागाने जिल्ह्यात १८ ठिकाणी अत्याधुनिक उष्माघात कक्षांची उभारणी केली आहे. उष्णतेचा त्रास जाणवल्यास नागरिकांनी त्वरित जवळच्या सरकारी किंवा खासगी रुग्णालयात उपचार घ्यावेत, असे आवाहन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. विनय सोनवणे यांनी केले आहे.**

जिल्ह्यातील नटावद, खोंडामळी, धानोरा, धडगाव, मोलगी, जमाना, अक्कलकुवा, रनाळा, खांडबारा, विसरवाडी, म्हसावद, शहादा आणि तोरणमाळ या ग्रामीण रुग्णालयांमध्ये उष्माघात कक्ष सुरू करण्यात आले आहेत. तसेच तळोदा आणि नवापूर येथील उपजिल्हा रुग्णालयांमध्ये, नंदुरबार व धडगाव येथील महिला रुग्णालयात आणि जिल्हा रुग्णालयातही ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. उष्माघात कक्षांमध्ये एसी, कुलर, पंखे आणि स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. प्रत्येक ठिकाणी किमान पाच खाटा राखीव ठेवण्यात आल्या असून रुग्णांवर तातडीने उपचार करता यावेत (पान ४ वर)



## शिरपूरच्या केतकीबेन पटेल सेंट्रल लायब्ररीस मुख्यमंत्र्यांची सदिच्छा भेट

**धुळे, दि.२६ - शिरपूर शहरात जलसंधारणासोबतच शिक्षण, आरोग्य व औद्योगिक क्षेत्रात झालेली प्रगती ही राज्यासाठी पथदर्शी आहे. येथील सेंट्रल लायब्ररी विद्यार्थ्यांसाठी ज्ञानकेंद्र ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिरपूर येथे व्यक्त केला.**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी आज सकाळी शिरपूर येथील केतकीबेन मुकेशभाई पटेल सेंट्रल लायब्ररीस भेट दिली. यावेळी ते बोलत होते. त्यांच्या समवेत आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा आदी होते.मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, शिरपूरमध्ये राबविण्यात आलेले जलसंधारण मॉडेल यापूर्वी राज्यात आदर्श ठरले असून, आता शिक्षण क्षेत्रातही शिरपूरने देशपातळीवर वेगळा ठसा उमटविला आहे. शहरात उभारण्यात (पान ४ वर)

## काझी प्लॉट परिसरात शिक्षिकेवर चाकु हल्ला

धुळे, दि.२६ - शहरातील काझी प्लॉट रियाजउल्ला मदरसाजवळ शिक्षिकेला तिच्या पतीला तलाक देवून आपल्या सोबत राहण्याचा आग्रह एकाने धरला. शिक्षिकेने विरोध दर्शविल्याने शिवीगाळ करत धारदार चाकुने प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली. पिडीत शिक्षिकेने दि. २५ एप्रिल रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, काझी प्लॉट रियाजउल्ला मदरसाजवळील रहिवासी फैसल ऊर्फ राजू खलील शाह याने दि.२२ एप्रिल रोजी दुपारी बारा वाजेच्या सुमारास शिक्षिकेला सांगितले की, तुझ्या नवऱ्याला तलाक देवून माझ्या सोबत रहा. पिडीतेने तलाक देण्यास तसेच सोबत राहण्यात (पान ४ वर)




## महाराष्ट्र प्रदेश सर्वोदय मंडळाच्या अध्यक्षपदी रमेश दाणेंची फेरनिवड

**अकोला दि.२६- महाराष्ट्र प्रदेश सर्वोदय मंडळाच्या अध्यक्षपदी पुढील तीन वर्षांसाठी बिनविरोध फेर निवड करण्यात आली आहे. जेआरडी टाटा स्कूल मध्ये झालेल्या एक दिवसीय लोकसेवक अधिवेशनात निवडणूक निर्णय अधिकारी प्रा.प्रवीण भोयर यांनी रमेश दाणे यांच्या नावाची घोषणा केली.अध्यक्षपदासाठी आणखी एक उमेदवार बजरंग सोनवणे मुंबई यांनी माघार घेतल्याने एकच उमेदवारी अर्ज उरल्याने निवडणूक बिनविरोध झाल्याचे घोषित करण्यात आली.बजरंग सोनवणे पुढील तीन वर्षे महामंत्री म्हणून काम करणार आहेत.**

महाराष्ट्रात आणि देशात प्रतिकुल राजकीय परिस्थिती आहे. गांधीयन आणि पुरोगामी चळवळ कमकुवत करण्याचे प्रयत्न होत असताना ती वाचविण्याचे आणि पूरक संस्थाना वाचविण्याचे आव्हान समोर आहे. त्यासाठी एकदिलाने काम करण्याची गरज असल्याचे प्रतिपादन रमेश दाणे यांनी यावेळी बोलताना केले. अधिवेशनाचे उदघाटन लोकमत नागपूर आवृत्तीचे संपादक श्रीमंत माने यांच्या हस्ते झाले. आजच्या स्थितीत गांधी विनोबा आणि जेपींचा विचार तरूणांपर्यंत पोहचवण्याची निकड निर्माण झाल्याचे माने यांनी सांगितले. ॲड.अविनाश (पान ४ वर)

## साक्री रोड परिसरात तरूणावर चाकु हल्ला

धुळे, दि.२६- साक्री रोड परिसरात जुन्या वादातून एका तरूणावर चाकु हल्ला झाल्याची घटना घडली आहे.मिळालेल्या महितीनुसार, साक्री रोडवरील कल्याणी दूध डेअरी येथील जिलेबी दुकानाजवळ महेंद्र दिनेश वाघ(वय २६) रा.भिम नगर, साक्री रोड,धुळे याचा आदित्य सुखदेव पारेराव रा.भिम नगर, साक्री रोड,धुळे यांच्यात वाद झाला. तू माझ्या मित्राविरूध्द गुन्हा का दाखल केला ? असा जाब विचारत आदित्य पारेराव याने महेंद्र वाघ याच्या पाठीवर धारदार शस्त्राने वार केला. या प्रकरणी शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिपक ज्वेलर्स
सोने- 22 K -1,39,700 रु.+3% GST
सोने- 24 K -1,52,500 रु.+3% GST
चांदी- 2,49,000 रु.+3% GST
तारगल्ली, सराफ बाजार, धुळे
फोन नं.२३३१०३/२३४१०३

जांभुळ ज्युस मिळेल




नैसर्गिक पद्धतीने पिकवलेल्या जांभळा पासून तयार केलेला रस (ज्युस) उपलब्ध आहे. कोणताही रंग, संरक्षक (प्रिझर्व्हेटीव्ह), पाणी न टाकता बनवलेला जांभळाचा शुद्ध रस (ज्युस) 200.MLच्या काचेच्या बाटलीत उपलब्ध आहे.
संकेत नित्या फार्म
जनशक्ती बिल्डींग दै.आपला महाराष्ट्र कार्यालय
वीर सावरकर मार्ग- धुळे. ०२५६२-२३५३९६, २३८३९६

## मानव एकता दिनी नंदुरबारला रक्तदान शिबिरास प्रतिसाद

**नंदुरबार, दि.२६- संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन द्वारा आयोजित संत निरंकारी मंडळाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर विवारी परमपूज्य सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज यांच्या कृपेने धुळे झोन ३६ बी ब्रांच नंदुरबार येथील संत निरंकारी सत्संग भवन श्रीराम सोसायटी सिंधी कॉलनी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ६४ दात्यांनी रक्तदान केले. त्यात महिला व पुरुषांनी सहभाग घेतला.**

या शिबिराचे उद्घाटन नगराध्यक्षा सौ. रत्नाताई चंद्रकांत रघुवंशी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आले. या शिबिराचे अध्यक्षस्थानी धुळे झोन बीचे प.आ.महेश वाघ संयोजक पाचोरा, तसेच प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद कृषी अधिकारी नंदकुमार सूर्यवंशी, नगरसेविका सौ.टीना कमल ठाकूर, डॉ.लालचंदाणी, कमल ठाकूर, माजी नगरसेवक शत्रुघन बालानी, राजू मंदाना हे उपस्थित होते रक्त संकलन करण्यासाठी रक्त केंद्र जिल्हा रुग्णालय नंदुरबार येथील जयेश सोनवणे वैद्यकीय अधिकारी डॉ.कार्तिक शर्मा, डॉ. ओमकार पिंगळे, किरण मेठे समुपदेशक, वंदना कोकणी तज्ञ, कविता गुरव लिपिक, संजय भामरे शिपाई व संत निरंकारी मंडळाचे सेवा दल पुरुष व महिला व भाविक यांनी रक्तदान शिबिराचे आयोजनासाठी परिश्रम घेतले. गेल्या पंधरा वर्षापासून संत निरंकारी मंडळातर्फे रक्तदान शिबिर घेण्यात येत आहेत. मोठ्या प्रमाणावर रक्तदाते रक्तदान करीत असतात.

## जिल्हाधिकाऱ्यांची बदली होण्याची शक्यता

धुळे, दि.२६- राजकीय गोटातून मिळालेल्या माहितीनुसार जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते यांची बदली होणार असल्याचे अनधिकृत वृत्त आहे.

गेल्या काही महिन्यातील घडामोडी लक्षात घेता ही बातमी राजकीय गोटात उपलब्ध झाली आहे. पुढील आठवड्यात त्यावर ठोस घडामोड होवू शकते, असे देखील सांगितले जाते. यामुळे लवकरच खरे काय ते समजणार आहे.

## मुख्यमंत्र्यांच्या भेटीत नगरसेवकांनी मांडल्या शहरातील विविध समस्या

**नंदुरबार, दि.२६ (प्रतिनिधी)- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शिरपूर येथे नंदुरबार येथील भाजपा नगरसेवकांनी भेट घेतली. त्यावेळी शहरातील विविध विकासकामांचे मुद्दे आणि प्रश्न त्यांनी मांडले असता मुख्यमंत्री फडणवीस यांनी या प्रकरणी दखल घेऊ असे आश्वासन दिले.**

नंदुरबार नगरपालिकेतील विरोधी गटनेता हिरालाल चौधरी, नगरसेवक आनंदा माळी, चारुदत्त कळवणकर, लक्ष्मण माळी, नगरसेवक पंकज चौधरी, एडवोकेट प्रकाश भोई, सामाजिक कार्यकर्ता सतीश मराठे, ओम प्रकाश अग्रवाल आणि अन्य उपस्थित होते. माजी मंत्र्यांनी मंजूर करून दिलेल्या शहरातील विविध समाज संघटनांच्या सामाजिक भवन उभारणीतील अडथळे तसेच शहरातील विविध प्रश्न याकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे त्यांनी लक्ष वेधले. नंदुरबार शहरातील जनतेशी संबंधित हे सर्व प्रश्न तातडीने सोडवले जातील तसेच निधी प्राप्त होण्याच्या मार्गातील अडथळे व विकास कामातील अडथळे लवकरच दूर केल्या जातील असे त्यांनी आश्वासन दिले.

# आपला महाराष्ट्र

## राजकारण्यांची पुस्तक आणि विवेकाशी फारकत

शिवाजी कोण होता या टायटलच्या कॉ. गोविंद पानसरे यांच्या पुस्तकावर आमदारांनी व्यक्त केलेली कडवट आणि भडकाऊ प्रतिक्रिया लोकांना आवडलेली नाही. राम, कृष्ण, परशुराम.अर्जून.युधिष्ठिर.यासह इतिहास पुरूषांच्या नावांचा उल्लेख इतिहासात बहुतेक एकेरीच असतो.मात्र यावरून उगाचच वाद उपस्थित करण्यात आला असून लेखक आणि प्रकाशकास शिविगाळ हा असंस्कृतपणा आहे तर मला पुस्तक वाचण्याची गरज नाही असे म्हणणे हा गावंढळपणा आहे.दुर्दैव असे की,अशा प्रकारचे लोकप्रतिनिधी लोक निवडून देतातच कसे हा यक्ष प्रश्न समोर उभा राहतो. वास्तविक शिवाजी कोण होता हे पुस्तक काही आज निघालेले नाही.अनेक वर्षे त्यास झालेली आहेत.त्याच्या नावावरून वादही झालेले आहेत.कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्येनंतर पुन्हा एकदा ते पुस्तक चर्चेत आलेले होते.ते ज्यांनी ज्यांनी वाचले त्यांचा टायटल वरून झालेला गैरसमज लगेच दूर झाला.पण ज्यांनी डोळ्यांवर आंधळ्या श्रद्धेचे कातडे पांघरलेले आहे किंवा ज्यांनी झोपेचे सोंग घेतलेले आहे त्यांना काहीच सांगून उपयोग नाही. मुळात छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल फक्त आम्हालाच आदर आहे बाकिच्यांना नाही असे मानणेच अज्ञान मूलक आहे. इतके वर्षांपासून चर्चेत असलेले पुस्तक एखाद्या लोकप्रतिनिधींला माहिती नाही हे तर त्याहून मोठे अज्ञान म्हणावे लागेल. याचा अर्थ जे लोक महाराजांच्या आरत्या करतात,त्यांची मंदिरे उभारून पूजा करतात तेच खरे महाराजांचा आदर करतात असे मानणारा एक वर्ग आहे. ते मोठे षडयंत्र असून महाराजांचे पराक्रम, त्यांच्या राज्य कारभाराची पध्दती, त्यांचा मुत्सद्दीपणा, गनिमी कावे, रयतेची काळजी, या मुद्द्यांकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करून फक्त अंधभक्तीचे उदात्तीकरण करणे म्हणजेच शिवरायांचा आठवावा प्रताप भूमंडळी या भूमिकेला काळीमा फासणे होय. या अशा प्रकारच्या भूमिकेची भलामण लोकप्रतिनिधींनी करावी हे विवेकवादी दृष्टिकोनातून महाराजांच्या जीवनाचा मागोवा घेणारा आणि तत्व म्हणून स्वीकारणारा जो वर्ग आहे त्या वर्गाचा अपमान आहे.

एखाद्या पुस्तकातील विचारांशी मतभेद असू शकतात; परंतु लेखक आणि प्रकाशकांना शिवीगाळ करणे हा असंस्कृतपणा आहे. त्याहूनही मला ते पुस्तक वाचण्याची गरज नाही असे म्हणणे ही अत्यंत गावंढळ आणि अविवेकी भूमिका ठरते. एखाद्या विचाराला उत्तर देण्याचा सुसंस्कृत मार्ग म्हणजे तो विचार समजून घेऊन तर्काने प्रतिवाद करणे हा होय. दुर्दैवाची बाब अशी की, अशा प्रकारची असंयमी विधाने करणारे लोकच लोकप्रतिनिधी म्हणून निवडून येतात आणि त्यामुळे समाजात चुकीचा संदेश जातो.पण आपल्या देशात असे सर्रास घडते.याचा अर्थ सत्याहत्तर वर्षे वयाच्या लोकशाहीत प्रगल्भ आणि विवेकी नागरिक तयार होऊ शकला नाही. त्यामुळेच अविचारी लोकप्रतिनिधी निवडून जातात. हे वास्तव नाकारून चालणार नाही. पुस्तकाच्या एकेरी नावावरून चिडलेल्या लोकप्रतिनिधींनी प्रकाशकांना भरपूर शिव्या दिल्या. त्या सगळ्या असंसदीय होत्या. ते जरी लोकप्रतिनिधी आहेत तरी सभागृहात अशा पद्धतीची भाषा निश्चितच वापरणार नसतील.मात्र फोनवर प्रकाशकांशी बोलताना त्यांनी वापरली. त्यांच्या भाषेवर सोशल मीडियावर असंख्य लोकांनी आक्षेप घेतला त्यामुळे त्यांनी दिलगिरी व्यक्त करीत सारवासारव केली असली तरी नावाच्या संदर्भात त्यांची भूमिका कायम असल्याचे त्यांनी सांगितले. म्हणजे यापुढे कोणीही इतिहास लिहिताना एकेरी नामोल्लेख केला म्हणजे हे लोकप्रतिनिधी त्याला जिवंत ठेवणार नाहीत एवढे निश्चित. एका अर्थाने हा लोकशाहीत हुकुमशाहीचा झालेला जन्म होय. सर्वसामान्य लोकांना त्यांच्या या भूमिकेबद्दल कुतूहल वाटलेले असणार आणि खरोखरच छत्रपतींच्या नावाचा उल्लेख फार प्रतिष्ठापूर्वक केला पाहिजे असेही वाटत असणार. लोकांच्या या मानसिकतेचा फायदा संबंधित लोकप्रतिनिधींना मिळेल आणि त्यांची मते वाढतील. कदाचित याच साठी केला होता अट्टाहास असेही असावे. मुद्दा असा आहे की महाराष्ट्रात अनेक वर्ष हे पुस्तक गाजत असताना त्याविषयी किंचित देखील कल्पना लोकप्रतिनिधींना नसावी आणि अशा प्रकारचे लोकप्रतिनिधी महाराष्ट्रात असावेत हे महाराष्ट्राचे दुर्दैव म्हणावे लागेल.

साहित्यिक त्यांचे साहित्य आणि त्यांचे समृध्द वैचारिक विश्व यापासून राजकीय क्षेत्रातील भले भले किती तरी लांब अंतर ठेवून आहेत. तेही या प्रकरणातून दिसले. ज्या दिवशी या लोकप्रतिनिधींनी पुस्तकाच्या प्रकाशकाला फोन करून शिव्या दिल्या. तो दिवस जागतिक पुस्तक दिन म्हणून जग साजरा करीत होते. त्याच पुस्तक दिनी पुस्तकाशी मला काही घेणे देणे नाही असे बोलणारा आणि नावावरून अश्लील शिवीगाळ करणारा लोकप्रतिनिधी लोकांनी बघितला त्याच वेळी हे लक्षात आले की, पक्ष कोणताही असो त्या पक्षाच्या वतीने निवडून जाणाऱ्या लोकप्रतिनिधीचे आणि पुस्तकांचे अंतर देखील खूप आहे. पुस्तकाचे त्यांना जवळजवळ वावडे आहे.कॉ.गोविंद पानसरे यांच्या हत्येने महाराष्ट्रातील सामाजिक क्षेत्रातील असंख्य लोक त्यांच्या हत्येच्या संदर्भात अजूनही संवेदनशील आहेत. लोक भरपूर व्यथित आहेत अशा कार्यकर्त्यांच्या विषयी या लोकप्रतिनिधीने अत्यंत असंवेदनशील तसेच अनुदार उद्गार काढले. यावरून सामाजिक कार्यकर्त्यांविषयीची अनादार आणि असंवेदनशील भावना स्पष्ट होते. पूर्वी सामाजिक कार्यकर्त्यांच्या शिवाय राजकीय क्षेत्रातील लोकांचे भागत नसे. सल्ला मसलत करण्यासाठी त्यांची नेहमी आवश्यकता असे. त्यांच्याशी झालेल्या चर्चातून राजकीय लोक वाटचाल करीत असत. इतका मान मरातब सार्वजनिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांना होता. तो दबदबा आता राहिलेला नाही. आता जो निवडून येतो तो तत्त्वज्ञानाचा पुतळा असतो. लोक त्याला अभिवादन करतात. अशी आजच्या राजकारणाची परिस्थिती आहे. पूर्वी माध्यम कर्मचारी असो , संपादक असो, की मालक असोत. त्यांच्यावर कोणाचाही दबाव नसायचा. त्यामुळे त्यांना बोलायचा अधिकार होता. तो अधिकार आता पूर्ण मीडिया गमावून बसला आहे. सार्वजनिक क्षेत्रातील कार्यकर्ते आता पूर्वीप्रमाणे भान नसलेले दिसतात. त्यांना लवकर खरेदी करता येते त्यामुळे अशावेळी निकोप समाज व्यवस्थेची अपेक्षा करणे निरर्थक ठरेल. अशा समाजातून प्रगल्भ लोकप्रतिनिधी निवडून पाठवण्याची शक्यता देखील घुसर झालेली आहेच ती पुन्हा दुप्पट होईल. स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या रोखठोक भाषेमुळे कधीकाळी विधाने व्यक्त होत असत.तेव्हा आणि आताही लोकांनी तसे सगळे निमुटपणे सहन केले . इतका नेभळट समाज यापूर्वी कधीच बघितला नव्हता. तो आता बघायला मिळत आहे. जणू हे आपण जसे आहे तसे स्वीकारले आहे अशी मानसिकता सर्वांची झाली आहे. विशेष म्हणजे महिलांनी चुकूनही ज्या शिव्या अजिबात ऐकायच्या नसतात त्या शिव्यांची लाखोली बाजारात वाहिली जाते तशा पध्दतीच्या शिव्या संबंधित लोकप्रतिनिधी महिलांना देत असेल आणि एकही महिला त्याविषयी काहीच बोलणार नसेल तर त्यांची सुद्धा बुध्दी भ्रष्ट झाली असे समजावे. उठसूट राष्ट्रीय नेत्यांच्या छायाचित्रांना जोडे मारण्याचे काम करणाऱ्या महिला जेव्हा अशोक खरात सारख्या स्वधर्मीय तथाकथित बाबाने मोठ्या प्रमाणावर महिलांचा वापर करूनही ब्र शब्द बोलणार नसतील तर (पान ३ वर)

प्रकाश में आज

जोश




शाहरुखखान, ऐश्वर्यारॉय, शरद कपूर, चंद्रचूडसिंग

## तापमानात वाढीचा परिणाम

धुळे, दि.२६- शहर आणि जिल्ह्याचे तापमान चाळीस अंशाच्या पुढे गेल्यामुळे सकाळी दहापासूनच रस्ते निर्मणुष्य होत आहेत. तापमान वाढीमुळे सार्वजनिक रुग्णालयांमध्ये उष्म ाघात नियंत्रण कक्ष सुसज्ज असावेत अशी अपेक्षा नागरिकांची आहे. कारण मराठवाड्यात उष्माघाताने नागरिकांचे बळी जात आहेत. त्याचवेळी हवामान खात्याने तापमान वाढीचा इशारा दिलाय.









# हीरक महोत्सवी मराठी विज्ञान परिषद



मराठीतून विज्ञान व्यक्त करता यावे आणि समाजात वैज्ञानिक दृष्टीकोनाचा प्रसार व्हावा हे मुख्य उद्देश लक्षात घेऊन २४ एप्रिल, १९६६ रोजी म. ना. गोगटे यांनी मराठी विज्ञान परिषदेची स्थापना केली. त्या घटनेला २४ एप्रिल २०२६ ला साठ वर्षे झाली. आता व्यक्तीच्या जीवनात काय की संस्थेच्या जीवनात साठ वर्षे पुरी होणे याला पूर्वीएवढे महत्त्व राहिले नाही. व्यक्तीच्या जीवनातील आयुष्मान आता ७० झाले आहे, सकस अन्न आणि उत्तम औषधे यांनी ते घडविले. पण संस्थेच्या जीवनाचे काय? तशा रोज नवनव्या संस्था निर्माण होतात आणि त्या पावसाळ्यातील हरळीसारख्या उगवतात आणि पावसाळा संपल्यावर नष्टही होतात. संस्था टिकतात त्या त्यांचे उद्दिष्ट समाजपयोगी असेल तर आणि प्रामाणिक व दीर्घ काळ काम करणारे कार्यकर्ते लाभले तर संस्थेलाही दीर्घायुष्य लाभू शकते. यासाठी महाराष्ट्रातल्या साहित्य संस्था, साहित्य आणि नाट्य संमेलने, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, सवाई गंधर्व संगीत महोत्सव यांची उदाहरणे देता येतील. याच नामावलीत आता मराठी विज्ञान परिषदेचे नाव घेता येईल.

मराठी विज्ञान परिषदेच्या स्थापनेत म. ना. गोगटे यांच्याबरोबर डॉ. रा. वि. साठे, प्रा. प. म. बर्वे, श्री ज. ग. बोधे, डॉ. म. आ. रानडे, प्रा. रा. वि. सोवनी होते. संस्था मुंबईत स्थापन झाली, परंतू विज्ञान प्रसाराच्या कार्याबद्दल गावोगावी आस्था असल्याने वर्षभरातच पुणे, ठाणे, नाशिक, सांगली, गोवा अशा ठिकाणी शाखा निर्माण झाल्या. आज अशा शाखांची (ज्यांना १९७१ साली स्वायत्तता दिल्याने विभाग म्हटले जाऊ लागले) संख्या ६७ आहे. विभागात काम करणारे शिक्षक आणि प्राध्यापकांच्या बदल्या झाल्या अथवा त्यांनी इतरत्र नोकरी पत्करली नि त्यांना निष्ठावंत कार्यकर्ते मिळवता आले नाहीत तर ते विभाग बंद पडतात. अशां बंद पडलेल्या विभागांची संख्या लक्षात घेतली तर गेल्या साठ वर्षात किमान १०० तरी विभाग निर्माण झाले होते.

परिषदेने पहिल्याच वर्षी वार्षिक अधिवेशने घ्यायला सुरुवात केली. ती दरवर्षी नियमाने होत आल्याने त्यांनीही नुकतीच साठ वर्षे पूर्ण केली. त्याच वर्षी परिषदेने विभागाविभागात संपर्क राहावा म्हणून मुखपत्र सुरु केले. यथावकाश त्याचे रुपांतर मराठी विज्ञान परिषद पत्रिकेत झाले. पत्रिकेनेही आता ५८ वर्षे पूर्ण केली असून आतापर्यंत ६३३ अंक प्रकाशित झाले आहेत. मराठी साहित्य विश्वात मासिके मोठ्या संख्येने बंद पडली असताना सृष्टीज्ञान (९७ वर्षात) आणि मराठी विज्ञान परिषद पत्रिका (५८ व्या वर्षात) आहेत हे स्पृहणीय असून मनाला उभारणी देणारे आहे. निदान एवढ्या एका मुद्यावरून समाज वैज्ञानिक दृष्टीकोन स्वीकारत आहे असे म्हणावे का?

परिषदेने विज्ञान विषयावर भाषणे आयोजित करणे, विज्ञान विषयक लेख वर्तमानपत्रात लिहिणे, शालेय विद्यार्थ्यांसाठी प्रयोगाचे, शंका समाधानाचे, अनुवाद शिबिराचे, लैंगिक शिक्षणाचे, गच्चीवरच्या बगीच्याचे, छोटी छोटी पुस्तके छापण्याचे, संशोधनाकडे वळा, विज्ञानकथा स्पर्धा, लोकसत्तेतील २१ वर्षे सातत्याने चाललेले कुतूहल सदर असे अनेक कार्यक्रम केले. प्रत्येक अध्यक्षांनी त्यात काहीनाकाही भर घातली. विद्यमान अध्यक्ष प्रा.जे.बी.जोशी यांनी परिषदेत पीएच.डी चा कार्यक्रम सुरु केला, विज्ञान एकांकिका स्पर्धा सुरु केल्या, महाविद्यालयातील आणि विद्यापीठातील प्राध्यापकांना अध्यापनाबरोबर संशोधन करण्यासाठी एकेक लाख रुपयांचे एम.एम.शर्मा पुरस्कार सुरु केले, परिषदेतर्फे नामवंत संशोधकांना दोन लाख पन्नास हजार रुपयांचे दरवर्षी दोन दोन जीवनगौरव पुरस्कार सुरु केले, शालेय विद्यार्थ्यांना प्रयोग पाहता यावेत म्हणून शनिवारी विज्ञानवारी कार्यक्रम सुरु केला, दूरदर्शनवर विज्ञान मालिका सुरु केल्या आणि प्रयोगाशाळा साहाय्यकांसाठीच्या कार्यशाळा सुरु केल्या. नुकताच त्यांनी नवनिर्मिती प्रयोगशाळा हा कार्यक्रम सुरु केला.

परिषदेला अध्यक्षांची एक प्रभावळ लाभली. त्यात मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू असलेले डॉ. रा. वि. साठे, स्वत: म. ना. गोगटे, प्रा. भा. मा. उदगावकर, प्रा.जयंत नारळीकर, डॉ. वसंत गोवारीकर, श्री. प्रभाकर देवधर आणि सध्याचे प्रा.जे.बी.जोशी हे आहेत.परिषद स्वयंसेवी संस्था असून ती धर्मादाय आयुक्तांकडे नोंदलेली संस्था आहे. तिला कोणतेही सरकारी निर्वाह अनुदान मिळत नसून ती स्वत:च्या पायावर उभी आहे. तिचे स्वत:चे मुंबईत दुमजली विज्ञानभवन आहे. संस्था सातत्याने नवनवीन कार्यक्रम करीत असून शतक पूर्ण करण्याच्या उमेदीत आहे.

आजमितीला मराठी विज्ञान परिषदेचे एकूण ६७ विभाग कार्यरत असून त्यातील ४ विभाग हे बृहन्महाराष्ट्रात आहेत. मराठी विज्ञान परिषद, धुळे विभाग या विज्ञानाच्या प्रचार आणि प्रसारासाठी कार्यरत स्वयंसेवी संस्थेची स्थापना दि २८ फेब्रुवारी १९९३ रोजी धुळे शहरातील प्रतिथयश उद्योजक, मविप धुळे विभागाचे संस्थापक अध्यक्ष, मा. श्री किशोर यशवंत पाटील यांच्या शुभहस्ते तसेच तत्कालीन जयहिंद महाविद्यालयाचे माजी प्राचार्य अण्णासाहेब ना. कौ, पाटील, तत्कालीन जयहिंद महाविद्यालयाचे प्राचार्य अण्णासाहेब डॉ. के. बी. पाटील आणि सर्व आजीव सभासदांच्या उपस्थितीत झाली. त्याच वर्षी धर्मदाय आयुक्तांकडे संस्थेची नोंदणी देखील केली. आज संस्थेला आयकर सवलत प्रमाणपत्र तसेच सी. एस. आर. प्रमाणपत्र देखील प्राप्त झालेले आहे.

संस्थेतर्फे आजपर्यंत अनेक उपक्रम राबविले गेलेत. वर्तमानपत्रात काही सदरे चालविली गेली. त्यात दैनिक आपला महाराष्ट्र या वृत्तपत्रात बालांगण या सदरात का? कसे? कुठे? केव्हा? या शीर्षाखाली ३० एप्रिल २०११ पासून दर शनिवारी चालू घडामोडींवर सदर सुरू करण्यात आले होते. स्थानिक वर्तमानपत्रात हे सदर आपला महाराष्ट्र या दैनिकात साधारणपणे दोन वर्ष चालविले. दरम्यान प्रासंगिक सदरांतर्गत देखील याच वृत्तपत्रात ओझोनशी मैत्री करा, पर्यावरणाचा समतोल राखायला हवा अन्यथा मनुष्याची अवस्था अशीच होईल, २६ व्या राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्ताने वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगा देशाचा विकास करा, राष्ट्रीय विज्ञान दिन इत्यादी विषयांवर लेख प्रकाशित झालेत. तसेच सन २००० पासून दरवर्षी राष्ट्रीय विज्ञान / गणित दिनानिमित्त तसेच इतर प्रासंगिक कार्यक्रमानिमित्त धुळ्यातील स्थानिक दैनिकात नियमितपणे लेख प्रकाशित होतात.

स्थानिक धुळे / जळगाव आकाशवाणी व दूरदर्शनवर काही कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. युनेस्कोने २०१५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय प्रकाश वर्ष म्हणून जाहीर केलेले होते. त्यानिमित्त मविप धुळे विभागातर्फे विविध जिल्ह्यांमध्ये दृक्श्राव्य माध्यमातून व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. गेल्या ४ वर्षांपासून ज्येष्ठ विज्ञान साहित्यिक डॉ. जयंतराव नारळीकर यांचा जन्मदिवस राष्ट्रीय विज्ञानकथा दिन म्हणून डॉ. जयंतराव नारळीकर यांच्या जीवनकार्याविषयी व्याख्याने, विज्ञान कथा कथन, भित्तीपत्रके स्पर्धा, पोस्टर स्पर्धा आयोजित करून साजरा केला जातो.या सर्व कार्यामुळे धुळे विभागाला खालील पुरस्कार प्राप्त झालेले आहेत.

आजमितीला मराठी विज्ञान परिषद, धुळे विभागाचे २५० आजीव सभासद असून ३१ आश्रयदाते सभासद आहेत. धुळे शहरातील सर्व शाळांपर्यंत मविप विभागाची एक वेगळी ओळख निर्माण करण्यात आम्ही यशस्वी झालेलो आहोत. जवळजवळ सर्व शाळांमधून व्याख्यानांचे, वयात येताना मुलांसाठी व मुलींसाठी डीव्हीडीशो, विज्ञानाच्या प्रयोगांचे डीव्हीडीशो, विज्ञानाच्या परीक्षेत सहभाग, विज्ञान पत्रिकेचे सभासदत्व, चि. श्री. कर्वे निबंध / कथा स्पर्धा, विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा, विज्ञान प्रकल्प स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन स्पर्धा, प्रयोगशाळा सहाय्यक कार्यशाळा, गणित शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळा, शनिवारी विज्ञानवारी अशा विविध प्रकारचे कार्यक्रम घेतल्यामुळे वैज्ञानिक दृष्टिकोन रुजवण्यात आमचा धुळे विभाग यशस्वी झाला आहे असे आम्हास वाटते. आजपावेतो मविप मुंबई मध्यवर्तीकडून सोपविलेल्या सर्व कार्यक्रमांचे आयोजन मविप धुळे विभागाने अखंडपणे केलेले आहे. उदा. १९९९ पासून अखंडपणे दरवर्षी राष्ट्रीय विज्ञान दिनाचे कार्यक्रम, राष्ट्रीय गणित दिनाचे कार्यक्रम, विज्ञान संशोधनाकडे वळा व्याख्यानांची शृंखला, संरक्षण विषयांवरील व्याख्याने, अधिवेशनाला जोडून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आयोजित विविध विषयांवरील कार्यशाळा, शुक्राचे अधिक्रमण व्याख्याने इत्यादी. तसेच १९९१ पासून एखाद दुसरा अपवाद वगळता सर्व अखिल भारतीय मराठी विज्ञान अधिवेशनात आमच्या विभागातील अनेक कार्यकर्त्यांबरोबरच विद्यार्थ्यांचा देखील लक्षणीय सहभाग राहिला आहे. विज्ञानाच्या काही प्रासंगिक कार्यक्रमांसाठी तज्ज्ञ मार्गदर्शक / संसाधन व्यक्ती म्हणून किंवा वैज्ञानिक संसाधनांसाठी तसेच विशिष्ठ वैज्ञानिक विषयांवर अधिक माहितीसाठी वर्तमानपत्रांमध्ये लेख हवा असल्यास मविप धुळे विभागाकडे मागणी होते. कदाचित आम्ही केलेल्या कार्यक्रमाचाच हा आदर्श परिणाम असावा असे वाटते.

**-प्रा.डॉ.आर.एम. शेवाळे**
कार्यवाह, मराठी विज्ञान परिषद, धुळे विभाग



## धुळ्यात संस्कार भारतीतर्फे वसुंधरा दिन विविध उपक्रमांनी साजरा

धुळे दि.२७- बावीस एप्रिल हा दिवस जागतिक वसुंधरा दिन म्हणून साजरा करण्यात येतो आणि अखिल भारतीय संस्कार भारतीच्या वतीने वसुंधरा दिन हा गेल्या अनेक वर्षांपासून भूअलंकरण करून म्हणजेच छानशी रांगोळी काढून साजरा करण्यात येत असतो, वसुंधरेचे पूजन तिच्या प्रति असलेला आदर यातून दाखवून तो संस्कार पुढच्या पिढीवर करण्याचा हा एक प्रयत्न. एकाच पद्धतीची रांगोळी संपूर्ण भारतभर संस्कार भारतीच्या माध्यमातून काढण्यात येते, तीच रांगोळी धुळे शहरामध्ये इतिहाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ येथे संस्कार भारती धुळे शाखेच्या वतीने काढण्यात आली, ज्यामध्ये सौ.स्वाती डंबीर, जुई डंबीर, सौ.नेरकर, सौ रेवती पागे यांनी अतिशय सुरेख पद्धतीने रांगोळी रेखाटली. याप्रसंगी संस्कार भारती महानगर अध्यक्ष पवन पोद्दार, कार्यवाह अजय कासोदेकर, कोशाध्यक्ष प्रा डॉ हेमंत जोशी व देवगिरी प्रांत विधाप्रमुख केदार नाईक उपस्थित होते.


## महिला साहित्य संघाच्या शहराध्यक्षपदी सुमनताई महाले

**धुळे, दि.२६- खान्देश साहित्य संघ महाराष्ट्र संचलित कवयित्री बहिणाबाई चौधरी महिला साहित्य संघाच्या धुळे शहर अध्यक्षा म्हणून सौ. सुमनताई पितांबर महाले यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच रेखाताई बारी यांची उपाध्यक्ष, सचिवपदी शोभाताई येवले, कार्यकारिणी सदस्य पदी अरुणा ताई शिरोडे यांची नियुक्ती करण्यात आली.**



कवयित्री बहिणाबाई चौधरी महिला साहित्य संघाच्या महाराष्ट्र प्रदेशच्या अध्यक्षा रत्नाताई पाटील यांनी खान्देश साहित्य संघाचे केंद्रीय अध्यक्ष डॉ.प्रा.सदाशिव सुर्यवंशी, सचिव रमेश बोरसे, प्रा. रमेश राठोड, कवी प्रभाकर शेळके, महेंद्र पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत नियुक्तीपत्र दिले. अक्षय तृतीयेला अहिराणी लोक वाड्मय दिवस धुळे येथे गौराई पूजन करून साजरा करण्यात आला. त्या कार्यक्रमात सदर नियुक्ती पत्र देण्यात आले. सर्व नुतन महिला पदाधिकार्यांचे मान्यवरांकडून अभिनंदन करण्यात येऊन पुढील दमदार वाटचालीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रमाला उपस्थित महिला साहित्यिकांनी देखील सुमनताई महाले आणि त्यांच्या कार्यकारिणीचे स्वागत केले.

### शब्दकोडे क्रमांक : २३५१



**आडवे शब्द :** १.निसर्गातील एक कठीण घटक वा पदार्थ ३.भीक मागणारा ५. एक खंड ८. तुकडा ९.सूर्यप्रकाशापासून मिळणारे जीवनसत्व १०. थाळी ११. अणू- रेणू इत्यादी होत १२. प्रश्न १४. शासन १६. समय १७.एक चर्म वाद्य २०. गोंधळ २२. विचार करणारे इंद्रिय २४. अभिनेता २५. याचक २७. झाडाचे मूळ २८. चिंतन ३०. वारसा ३२. क्लासमध्ये शिकवणाऱ्या शिक्षिकेला व शिक्षकाला देण्यासाठी ठरलेला मोबदला ३३. सोने ३५. कुटिल डाव ३६.आसू - विरुद्ध ३७. दुःख ३८. पंच ४०. सीमा ४२. बुद्धी ४४. इंग्रजीत - धाव ४५. अंकांची उजळणी ४६. शेत ४७. हुशार ४९. कुकर्म ५०. चक्कर ५२. भिस्त ५३. कणीसारखी ५४. खिडकीवरील काच

**उभे शब्द :** १. रायगडावरील एक बुरुज २.दशानन ४. रात्री चमकणारा एक कीटक ६. बुद्धिबळ ज्यावर खेळतात ७.एक धातूचा तंतू १२.अतूट १३.हिंदीत -१४. एक थोर पक्षी तज्ञ डॉक्टर * अली १५.एक म्हण बुडत्याला **चा आधार १८.एक पारंपरिक बसण्याचे साधन १९.भारताचा राष्ट्रीय खेळ २१.रोगप्रतिकारक देण्यात येणारे इंजेक्शन २३.वंदन २४.ख्रिस्ती जोगतीण २५.कुठलाही विचार न करता बोलणारी २६.स्वर २९.एखाद्यासारखे केलेले हावभाव ३१.धैर्य ३३.पाय ३४.वादक वाद्याचे करतात ३९.वसा चालवणारा ४०.गराडा ४१. उगवता-विरुद्ध ४३.तीन दशकांची संख्या ४५.डोळ्यावर असते ४६.मोकळीक ४८.एक इंग्रजी मद्य ४९.साखर पाणी मिळून तयार झालेले मिश्रण ५०.हिंदीत-पहाट ५१.मोठ्या भावास आपण आदरणीय हाक मारतो

### शब्दकोडे क्रमांक : २३५० चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| यो | गा | यो | ग | | ज | वा | ब | | त | रं | ग |
| | व | यो | ग | ट | | स | र | ग | म | | ज |
| मे | रा | | न | | म | | क | ल | | वा | रा |
| र | न | वे | | घा | त | पा | त | | त | ग | |
| ठ | | त | व | स | | ल | | ज | प | णू | क |
| | का | न | न | | आ | क | ल | न | | क | |
| ना | च | | रा | घ | व | | हू | | वा | | सा |
| री | | सा | ज | न | | स | | अ | द | मा | स |
| | चे | व | | दा | दा | मु | नी | | क | | र |
| तु | ला | | धी | ट | | द्र | | प्र | | प्र | |
| ट | | ती | र | | सं | | ग | ग | न | या | न |
| क | मा | न | | सं | ग | र | | त | | स | त |




# क.ब.चौ.उमविद्वारे अकॅडमिक अँड ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑडीटमध्ये आर.सी.पटेल आय.एम.आर.डी.परिसंस्थेला ए प्लस ग्रेड प्रदान



**शिरपूर, दि.२६- उत्तर महाराष्ट्र परिक्षेत्रात अग्रगण्य परिसंस्था म्हणून नावलौकिक असणाऱ्या आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट संचलित आय.एम.आर.डी. परिसंस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र जळगाव विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयांच्या अकॅडमिक अँड ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑडिट मध्ये आय.एम.आर.डी परिसंस्थेला 'ए प्लस' ग्रेड प्राप्त झाले आहे.**

कॉलेजेसमधील विद्याशाखा, विषय, त्यासाठी नियुक्त केलेले नियमित शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, शैक्षणिक वास्तू, त्यातील सुविधा, ग्रंथालय, विद्यार्थी संख्या, क्रीडा सुविधा, संशोधन, नॅक, एन.एस.एस. आणि आर्थिक माहिती या निकषांच्या आधारे सदर ग्रेड निश्चित होत असतो. या सर्व बाबतीत आय.एम.आर.डी. परिसंस्थेने उत्तम गुण प्राप्त करून ''ए प्लस ग्रेड मिळवला. ही अभिमानास्पद कामगिरी म्हणजे संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रगतीचा, गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा आणि विद्यार्थीकेंद्रित दृष्टीकोनाचा गौरव मानला जात आहे. शिरपूर शहरासह संपूर्ण उत्तर महाराष्ट्रासाठीही अभिमानाची बाब ठरली आहे. सदर यश सातत्यपूर्ण परिश्रम, दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण यामुळे प्राप्त झाले आहे.

उत्तर महाराष्ट्रात उत्कृष्ट शिक्षणाचे केंद्र म्हणून आर.सी.पटेल आय.एम.आर.डी. चे नाव नेहमी अग्रेसर असते. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, आधुनिक कौशल्ये आणि उज्ज्वल करिअरची दिशा देणारी संस्था म्हणून आय.एम.आर.डी. ने आपली विश्वासार्ह ओळख अधिक भक्कम केली आहे.

माजी शिक्षणमंत्री आमदार अमरिशभाई पटेल, माजी नगराध्यक्षा सौ.जयश्रीबेन पटेल, आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्ट अध्यक्ष भुपेशभाई पटेल, उपाध्यक्ष चिंतनभाई पटेल, सचिव राजगोपाल भंडारी, परिसंस्थेच्या संचालिका डॉ. वैशाली पाटील, विद्यापीठाचे पदाधिकारी व मॅनेजमेंट मेंबर्स तसेच डॉ.मनोज बेहेरे, डॉ. मनोज पटेल, डॉ. तुषार पटेल, रजिस्ट्रार प्रा. सुमित सगळे, सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, विद्यार्थी यांनी कौतुक केले.



# आर्ट ऑफ लिव्हिंगकडून जयदीप पवार यांना पुरस्कार प्रदान

**धुळे, दि.२६- नाशिक येथे आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेचे संस्थापक गुरुवर्य श्री श्री रविशंकर गुरुजी यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त व आर्ट ऑफ लिव्हिंग संस्थेला सेवेची ४५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल अनसग्स होरोझ (गुप्त हिरोझ) पुरस्काराची घोषणा करण्यात आली. त्यात धुळे जिल्ह्यातून सामाजिक कार्य क्षेत्रातील युवा नेतृत्व वेल्हाणे गावचे सुपुत्र चि.जयदीप धनसिंग पवार यांची प्रथमच जिल्हास्तरीय या आर्ट ऑफ लिव्हिंग परिवारातर्फे पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.**

नाशिक येथे पार पडलेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात नाशिक विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम व नाशिकचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते जयदीप धनसिंग पवार यांना त्यांचे वडील धनसिंग पवार व आई सौ.संगीता धंसिंग पवार यांच्या उपस्थिती पुरस्कार प्रदान करण्यात आला. गेल्या आठ वर्षांपासून सामाजिक कार्य क्षेत्रात केलेल्या भरीव कामगिरीबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. त्यांना सामाजिक कार्यात प्रवीण बोरसे, आनंदा मराठे, अनिल शिंदे, जितेंद्र बोरसे, अविनाश वाघ, अक्षय पवार, विजय माळी, प्रवीण कोळी, शरद बोरसे, योगेश बोरसे, डॉ.चंदू पवार, रविंद्र ठोके, भगवान शिरसागर, पंकज पाटील या सर्वांची साथ लाभते. जिल्ह्यातील विविध स्तरातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# खंबाळेतील आर.सी. पटेल विद्यालयात रोबोटिक्स, एआय समर कॅम्प

**शिरपूर– ग्रामीण व आदिवासी भागातील विद्यार्थ्यांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाची गोडी निर्माण व्हावी आणि आपल्या परिसरातील समस्या तंत्रज्ञानाच्या मदतीने सोडवण्याचे कौशल्य त्यांच्यात विकसित व्हावे, या उद्देशाने खंबाळे येथील आर. सी. पटेल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दहा दिवसीय मरोबोटिक्स व कृत्रिम बुद्धिमत्ताफ (एआय) समर कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. स्टेमसेज प्रायव्हेट लिमिटेड कंपनी यांच्या सहकार्याने आयोजित या शिबिराचे उद्घाटन एप्रिल रोजी मुख्याध्यापक नितीन चौधरी यांच्या हस्ते उत्साहात पार पडले.**




या दहा दिवसांच्या प्रशिक्षण काळात सहभागी विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानातील विविध विषयांचे सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे. यात प्रामुख्याने बेसिक रोबोटिक्स आणि इलेक्ट्रॉनिक्स रोबोट्सची रचना आणि कार्यपद्धती, मशीन लँग्वेज: यंत्रांशी संवाद साधण्यासाठी आवश्यक असणारी भाषा. सेन्सर तंत्रज्ञान: विविध प्रकारचे सेन्सर्स आणि त्यांचा व्यवहारिक वापर. इलेक्ट्रॉनिक इन्स्ट्रुमेंट: मूलभूत इलेक्ट्रॉनिक उपकरणांची ओळख व हाताळणी यावर मार्गदर्शन करण्यात येत आहे.

या कार्यशाळेत प्रथमेश माळी, मंदार पाटील, संकेत देवरे आणि अतुल बोरसे हे तज्ज्ञ मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह मार्गदर्शन करत आहेत. केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांनी स्वतः हाताने मॉडेल तयार करण्यावर या शिबिरात भर दिला जाणार आहे.विद्यार्थ्यांनी या दिवसांत तयार केलेल्या नाविन्यपूर्ण प्रकल्पांचे आणि रोबोटिक मॉडेल्सचे भव्य प्रदर्शन एप्रिल रोजी आयोजित करण्यात येणार आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाणार आहे.या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे शिक्षक जी. डी. शिवदे, दीपक राजपूत आणि के. बी. शिरसाळे हे विशेष परिश्रम घेत आहेत.उद्घाटन प्रसंगी मुख्याध्यापक नितीन चौधरी यांनी मार्गदर्शन केले.या उपक्रमामुळे खंबाळे परिसरात विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.



# जयनगर येथे राष्ट्रीय पंचायत राज दिन उत्साहात साजरा

**शहादा, दि.२६ (प्रतिनिधी)- तालुक्यातील जयनगर येथील ग्रामपंचायत कार्यालयात राष्ट्रीय पंचायत राज दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.**

यावेळी ग्रामस्थांच्या उपस्थितीत महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या प्रसंगी पंचायत राज व्यवस्थेचे महत्त्व, ग्रामस्वराज्याची संकल्पना, स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका आणि ग्रामीण विकासातील ग्रामपंचायतीचे योगदान यावर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच पारदर्शक कारभार, लोकसहभाग, स्वच्छता, पाणी व्यवस्थापन आणि शाश्वत विकास या मुद्द्यांवरही विशेष भर देण्यात आला. कार्यक्रमाला सरपंच मोगराज सोनवणे, गटनेता तथा उपसरपंच वनश्री ईश्वर संतोष माळी, ग्रामविकास अधिकारी बी. ए. पाटील, ग्रामपंचायत सदस्य शरद गोपाळ पाटील, सिंधुबाई सहारे, आर बी.पाटील, प्राथमिक आरोग्य उपकेंद्राचे डॉ.महेंद्र पाटील, अंकुश सोनवणे, नारायण सोनवणे, हिरालाल माळी, छोटू न्हावी, तुकाराम सोनवणे, ग्रामपंचायत शिपाई तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी ग्रामविकासासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याचा संकल्प केला.

# महावितरण कंपनीमार्फत प्रॉम्पट, ऑनलाईन पेमेंट, गो-ग्रीनद्वारे वीजग्राहकांना दहा कोटींची सवलत

**धुळे, दि.२६- महावितरणने ग्राहकांसाठी वीजविषयक सर्व सेवा डिजिटल पद्धतीने उपलब्ध करून दिलेल्या आहेत. या डिजिटल सेवांचा वापर वाढावा, यासाठी ग्राहकांना प्रोत्साहन दिले आहे. २०२५-२६ आर्थिक वर्षात महावितरणच्या जळगाव परिमंडलातील वीजग्राहकांनी डिजिटल पर्याय अवलंबून व तत्पर वीजबिल भरणा करून जवळपास १० कोटी रुपयांची सवलत प्राप्त केली आहे. सर्व ग्राहकांनी वीजबिलाचे ऑनलाईन व प्रॉम्प्ट पेमेंट करून व गो ग्रीनमध्ये नोंदणी करून घसघशीत सवलतींचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य अभियंता आय.ए. मुलाणी यांनी केले आहे.**

महावितरणकडून ग्राहकांनी सात दिवसांच्या आत बिल भरल्यास बिल रक्कमेच्या (कर व शुल्क वगळून) जवळपास १ टक्का तत्पर बिल भरणा सवलत, डिजिटल पद्धतीने ऑनलाईन (नेट बँकिंग, क्रेडिट/डेबिट/कॅश कार्ड, मोबाईल वॉलेट/यूपीआय इ. वापरून) वीजबिल भरल्यास बिल रकमेच्या (कर व शुल्क वगळून) ०.२५ टक्के डिजिटल बिल भरणा सवलत व गो ग्रीन सेवेचा पर्याय स्वीकारून छापील बिलाऐवजी ई-मेलवर वीजबिल घेतल्यास दरमहा १० रुपये सवलत दिली जाते. गो ग्रीनमध्ये नोंदणी केल्यानंतर वर्षाची १२० रुपयाची सूट ही एकरकमी दिली जात आहे.

जळगाव परिमंडलातील वीजग्राहकांनी मावळत्या आर्थिक वर्षात तत्पर वीजबिल भरणा सवलत ६ कोटी ५ लाख १ हजार ४२९, डिजिटल बिल भरणा सवलत १ कोटी ५० लाख ५० हजार १९२ व गो ग्रीन पर्याय निवडण्याची सवलत २ कोटी ४१ लाख ४२ हजार ९३० अशी एकूण ९ कोटी ९६ लाख ९४ हजार ५५१ रुपयांची सवलत मिळवली आहे. त्यात जळगाव मंडलातील ग्राहकांनी अनुक्रमे ३ कोटी ७५ लाख ८८ हजार ५५४, ९० लाख ९८ हजार ७५५ व १ कोटी ४४ लाख १४ हजार १०० रुपये सवलत मिळवली आहे. धुळे मंडळातील ग्राहकांनी अनुक्रमे १ कोटी ६९ लाख ५० हजार ६५८, ४१ लाख ६१ हजार ९३३ व ६२ लाख ४४ हजार ७४० रुपये सवलत मिळवली आहे, तर नंदुरबार मंडलातील ग्राहकांनी अनुक्रमे ५९ लाख ६२ हजार २१८, १७ लाख ८९ हजार ५०५ व ३४ लाख ८४ हजार ९० रुपये सवलत मिळवली आहे.

महावितरणने ग्राहकांना वीज बिल पाहणे व भरणे, तक्रार नोंदवणे, नवीन वीजजोडणी अर्ज, वीजभार व नाव बदलणे इ. सर्व सेवा महावितरण वेबसाईट, महावितरण ग्राहक मोबाईल पद्वारे डिजिटल माध्यमातून सुरक्षित, जलद व पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून दिलेल्या आहेत. त्यामुळे ग्राहकांच्या वेळ, श्रम व पैशांची बचत झाली आहे. त्यामुळे ग्राहकांनी या सेवांचा लाभ घेऊन नियमित व वेळेत ऑनलाईन वीजबिल भरावे तसेच वीजबिलांसाठी गो ग्रीन पर्याय स्वीकारावा, असे आवाहन महावितरणने केले आहे.

गो ग्रीनमध्ये असे व्हा सहभागी गो-ग्रीन योजनेसाठी महावितरणच्या वेबसाइटवर किंवा मोबाईल ॲपवर नोंदणी करण्याची स्वतंत्र सोय उपलब्ध आहे. केवळ ग्राहक क्रमांक सबमीट करावे लागेल व छापील बिलाची प्रत रद्द करून संबंधितांना नोंदणीकृत मोबाईल क्रमांक व इमेलवर दरमहा बिल पाठविण्यात येईल. नोंदणीकृत मोबाईल किंवा इमेल बदलण्याची सोय देखील त्याच ठिकाणी उपलब्ध आहे. गो-ग्रीन सहभागी झालेल्या ग्राहकांना त्यांच्या नोंदणीकृत 'इमेल'वर व मोबाईल 'एसएमएस'द्वारे दरमहा वीजबिल पाठविण्यात येत आहे. वीजबिलांच्या तारखेपासून सात दिवसांमध्ये रकमेचा तत्पर भरणा केल्यास एक टक्के सवलत दिली जाते. त्यासाठीही ऑनलाईन बिल भरणे सोयीचे झाले आहे. इमेलद्वारे प्राप्त झालेले दरमहा वीजबिल संगणक किंवा मोबाइलमध्ये जतन करून ठेवता येते. आवश्यकतेप्रमाणे वीजग्राहकांना ते कधीही डाऊनलोड करण्याची किंवा मूळ स्वरूपात रंगीत प्रिंट करण्याची सोय आहे.

# राजकारण्यांची पुस्तक आणि विवेकाशी फारकत

**(पान २ वरुन) त्यांनाही लोकशाही कळली नाही असेच म्हणावे लागेल.पूर्वी राजकारणात असलेल्या सर्वपक्षीय महिला अशा विषयांवर पक्षभेद विसरून आक्रमक भूमिका घेत होत्या. आता सत्ताधारी पक्षातील महिला गप्प आहेत .या शिव्या ऐकल्यानंतर त्यांना काहीच वाटले नाही म्हणूनच सत्ताधारी पक्षातील महिला अभिनेत्री, कलावंत लेखिका,सामाजिक कार्यकर्त्या हा राजकीय विषय म्हणून सोडून देतात आणि अशा विषयाशी आमचा काही संबंध नाही. जो असेल त्या संबंधाचे आम्ही बघून घेऊ अशी भूमिका घेतात त्याच दिवशी त्या विवेक भ्रष्ट झाल्या असे म्हणता येईल. लेखक तरी कुठे आहेत त्यांना आपणही उद्या सुपात असे पर्यंतच वाचणार आहोत असे निश्चितच वाटत असणार. लेखकाना किमान एखादी पोस्ट लिहिण्याची भीती बाळगण्याची गरज नाही .पण तशी भीती जर् लेखक विचारवंत आजच्या माहोलमध्ये बाळगत असतील आणि विचार शून्य वागत असतील तर त्यांच्यातील सत्वदेखील संपले असे समजावे. एवढे निश्चित की, या प्रकरणातील संबंधित लोकप्रतिनिधींनी दिलेल्या शिव्या ज्या सोशल मीडियावर प्रसारित झाल्या त्या ऐकल्यावर सार्वजनिक जीवनात कोणत्या थरातील लोक आले. हे पाहून मन विषन्न होते. जे पक्ष अशा लोकांना प्रतिनिधीत्व देतात त्या पक्षांची देखील कुठली वैचारिक भूमिका आहे तेही या निमित्ताने दिसून आले. बरबाद करने को बस एक उल्लू काफी है, यहा हर शाख पर उल्लू बैठा है, अंजामे गुलिस्ता क्या होगा अशी परिस्थिती राजकीय पक्षांनी आणून ठेवलेली आहे. अशा पक्षांच्या हातात देशाचे भागध्येय बांधलेले असेल तर त्या देशाची तरी अवस्था भावी काळात काय असणार आहे. त्याची कल्पना केलेली बरी. अशी परिस्थिती निर्माण होण्यास सार्वजनिक क्षेत्रातील कार्यकर्ते आणि विचारवंत यांची जी जबाबदारी आहे ती त्यांनी कधीच ओळखली नाही. गंगा गटारगंगा होते आहे तर होऊ द्या. तशीच ती वाहते आहे तर वाहू द्या अशी या वर्गाची भूमिका असल्यामुळे मग निवडीचे स्वातंत्र्य सर्वसामान्य माणसाकडे जाते. त्याची आकलन क्षमता मोठी असली तरी सध्याच्या काळात ती वापरली जाणार नाही याची दक्षता एक राजकीय पक्ष घेतो. आणि अशा प्रकारच्या भयानक लोकांना तो मान मरातब देतो तेव्हा असेच निष्कर्ष निघणार हे ठरलेले आहे. यामुळे कोणी कोणाला बोलावे, कोणी कोणाला पाठीशी घालावे, कोणी कोणाचे प्रबोधन करावे. या प्रश्नांची उत्तरे देखील मिळणे कठीण झाले आहे. इतकी परिस्थिती बिघडली. समाज ज्या मुक्कामावर आज आहे त्या मुक्कामावरून तो ढळू नये. अशी व्यवस्था धर्मांध चेहरा असलेल्या राजकीय पक्षांनी व्यवस्थितपणे करून ठेवलेली आहे. त्यातून बाहेर पडून वास्तव जगणारा वर्ग हाच खऱ्या अर्थाने विवेक वादी ठरतो.**

# पशुपालकांपुढे गंभीर प्रश्न

धुळे- कृषी उत्पन्न बाजार समितीने २८ मे पर्यंत जनावरांचा खरेदी विक्रीचा व्यवहार बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. कारण बाजार समितीत गर्दी झाल्याने सर्वांनाच गैरसोय होत आहे, असे बाजार समिती प्रशासनाचे म्हणणे आहे. परंतु वाढत्या तापमानामुळे वैरण आणि पाण्याची टंचाई निर्माण होत असल्याने गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

# स्मार्ट गर्ल वर्कशॉप उत्साहात संपन्न बीजेएसचा उपक्रम

**धुळे, दि.२६- भारतीय जैन संघटने (बीजेएस) तर्फे आयोजित स्मार्ट गर्ल वर्कशॉप उत्साहात संपन्न झाले. १३ ते १९ वयोगटातील किशोरवयीन मुलींसाठी आयोजित या कार्यशाळेला धुळे शहरातील विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.**



जैन भवन येथे नुकत्याच पार पडलेल्या या उपक्रमात मुलींच्या व्यक्तिमत्त्व विकासावर विशेष भर देण्यात आला. आत्मजागरूकता, संवाद कौशल्य, नातेसंबंध, महिलांचे आरोग्य, आत्मसन्मान व स्वसंरक्षण, योग्य निर्णय घेणे आणि मैत्री यांसारख्या महत्त्वपूर्ण विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. संस्थापक अध्यक्ष शांतीलाल मुथा यांचा हा ड्रीम प्रोजेक्ट असुन, आपल्या मुली भविष्यात सुखी व समाधानी राहाव्यात या उद्देशाने तयार केला आहे. राज्य अध्यक्ष केतन शाह यांच्या मार्गदर्शनाने व विभाग अध्यक्ष प्रा.चंद्रकांत डागा यांच्या प्रेरणेने ही कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेत प्रशिक्षक सुषमा गांधी (नाशिक) यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधत त्यांना आत्मविश्वास वाढविण्यासाठी आणि योग्य निर्णय घेण्यासाठी मार्गदर्शन केले. सहभागी मुलींनी विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेतला आणि आपल्या अनुभवांची देवाणघेवाण केली. कार्यक्रमासाठी अध्यक्ष तनु वर्धमान सिंगवी, वर्षा नाहर, स्नेहा कटारिया, दिशा छाजेड, शिखा बंब और श्वेता नाहटा आदींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी पालकांसोबत संवाद सत्र आयोजित करण्यात आले, ज्यामुळे मुली आणि पालकांमध्ये परस्पर समज वाढण्यास मदत झाली. आयोजकांनी या कार्यशाळेला मिळालेल्या प्रतिसादाबद्दल समाधान व्यक्त केले असून, भविष्यातही अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल, असे सांगितले.


## टायटल व्हेरिफिकेशन नोटीस व जाहीर नोटीस

तमाम जनतेस व सर्व हितसंबंधितांना तसेच सर्व बँका, पतपेढ्या, तथा इतर सर्व वित्तीय संस्थांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की,

**मिळकतीचे वर्णन :** तुकडी जिल्हा धुळे, पो. तु. ता. धुळे पैकी जि. प. ता. पं. स. धुळे पैकी मौजे धुळे येथील सर्व्हे क्रमांक ११/१+२/ब/१ मधील प्लॉट क्र. ४ चे एकूण क्षेत्र ३५३.०२ चौरस मीटर बखळ प्लॉट यांसी मौजे देवपूर विस्तारीत सिटी सर्व्हे क्रमांक ४७८५/क/१ चे एकूण क्षेत्र क्षेत्र २४९८.५० चौ. मी. यापैकी प्लॉट नं. ४ चे क्षेत्र ३५३.१५ चौ. मी. सत्ता प्रकार क असा लागलेला आहे. अशी बखळ प्लॉट मिळकत ज्यासी चतु:सिमा येणे प्रमाणे की, पुर्वेस : रस्ता, पश्चिमेस : रस्ता, उत्तरेस : प्लॉट नंबर ३, दक्षिणेस : प्लॉट नंबर ५ अशी बखळ प्लॉट मिळकत.

येणे प्रमाणे वर नमूद केलेल्या संपूर्ण चतु:सिमा व वर्णनाची बखळ प्लॉट मिळकत ही १) सौ. कविता दिलीप अग्रवाल आणि २) श्री. यश दिलीप अग्रवाल दोन्ही राहणार धुळे यांच्या संयुक्त पूर्णत: मालकीची स्वकष्टार्जित आणि प्रत्यक्ष कब्जे उपभोगातील मिळकत आहे. सदर मिळकतीमध्ये वरील दोन्ही व्यक्तींचे संयुक्त व अविभक्त हितसंबंध असून महसूल दप्तरी ७/१२ उतारा व सिटी सर्व्हे उताऱ्यावर वर नमूद मिळकत धारक यांचे नाव मालक व कब्जेदार सदरी लागलेले आहे. वर नमूद केलेल्या संपूर्ण वर्णनाची मिळकत खरेदी करण्याबाबतची प्राथमिक बोलणी आमचे पक्षकार यांनी वर नमूद मूळ मिळकतधारक यांच्याशी पूर्ण विश्वासाने सुरु केली असून सदर व्यवहाराचा प्रतिफळ (Consideration) निश्चित करण्यात आला आहे. त्याअनुषंगाने, नजिकच्या काळात आमचे पक्षकार सदर मिळकतीचे रीतसर कायम खरेदीखत नोंदवून घेणार आहेत.

सबब वर नमूद मिळकतीवर ज्या काही व्यक्ती/संस्था यांचा कोणताही हक्क, लाभ, अधिकार, दावा, मागणी, हितसंबंध, तसेच विक्री,अदलाबदल, भाडे, भाडेपट्टा, वहिवाट, परवाना, अभिहस्तांकन, गहाण, वारसाहक्क, भाडेपट्टा, मुत्यूपत्र, करार, कौटुंबिक तजवीज, हिंदु अन डिव्हायडेड फॅमिली, प्रतिपाळ, जप्ती, आरक्षण, किंवा कोणतेही दायित्व किंवा बांधिलकी, अत्यंदान, उत्तराधिकार, बक्षीस, धारणाधिकार, प्रभार, निर्वाह, सुविधाधिकार, विश्वस्तकब्जा, ताबा, तसेच कोणताही दावा, न्यायालयीन आदेश/हुकूमनामा, कंत्राट/करार, विकासननामा, देवाण-घेवाण, बेचेन-पत्र, कर्ज फिटेपर्यंत मिळकत ताब्यात ठेवण्याचा हक्क, हितभाग आणि / अथवा स्वारस्य असेलेले पतदार, आणि/अथवा लेंडर, समाविष्ट असलेले किंवा नसलेल्या व्यक्तींची संस्था,किंवा व्यक्तींची असोसिएशन,वित्तीय संस्था/वित्तीय बँका, कंपनी,स्वतंत्र व्यक्तीचा समावेश असलेल्या सर्व व्यक्तींनी त्यांचा ज्या कोणत्याही प्रकारचा हक्क असेल तो किंवा ज्या कोणत्याही मागणीच्या स्वरुपातील वर नमूद मिळकती किंवा वर नमूद मिळकतींचा कोणताही भाग किंवा त्याच्या हिश्यासंबंधी कोणताही आक्षेप असल्यास कृपया लेखी स्वरुपात पृष्टचर्थ सत्यप्रत कागदपत्रांसोबत निम्मलिखित स्वाक्षरीकारांकडे त्यांच्या खालील नमूद केलेल्या पत्त्यावर सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७(सात) दिवसाच्या आत आक्षेप/हरकती नोंदवाव्यात.

मुदतीनंतर येणाऱ्या तसेच वर्तमानपत्रात परस्पर प्रसिद्ध केलेल्या तसेच कागदपत्रांशिवाय आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस आमचे पक्षकार यांनी दिलेल्या माहिती व अधिकारावरुन तसेच दाखवलेल्या कागदपत्रांवरुन प्रसिद्ध करण्यात येत आहे. कळावे. ही जाहीर नोटीस. धुळे, दि. २५/०४/२०२६

**ॲड.विशाल शरद भट** मो. नं. ९३२६१९८१७९
कार्यालय : ३८, जानकी नगर, वाडीभोकर रोड, देवपूर, धुळे.



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे धुळे (नगर भुमापन रेकॉर्ड प्रमाणे धुळे–१) येथील सि. स. नं. ४७५५/३/अ/१ चे एकूण क्षेत्र २४३९.५० चौ. मी. यापैकी तुम्हास कायम खरेदी देण्याचा सौदा केला तो आमचे मालकीचे पश्चिमेकडील भागाचे क्षेत्र ४९.९० चौ. मी.

यासी चतु:सिमा

| दिशा | चतु:सिमा |
| --- | --- |
| पुर्वेस : | कै.उषाबाई पुंडलिक वाखारे यांचा भाग |
| पश्चिमेस : | वापर व रस्ता |
| दक्षिणेस : | रविंद्र मुरलीधर सोनार यांचे घर |
| उत्तरेस : | ईश्वर मुकुंदा पाटील यांचे घर |

सदर बखळ प्लॉट १) निलेश प्रकाशचंद जैन रा. १८३४, आग्रारोड, धुळे ता. जि. धुळे – ४२४००१, १) निलेश विजय भंडारी रा. ११, रत्नदिप नगर, अग्रवाल नगर, धुळे ता. जि. धुळे ४२४००१ यांनी कायम खरेदीने घेतला तेव्हापासून त्याचे मालकीचा व ताबे उपभोगातील असून त्यांनी सदरहू बखळ प्लॉट कायमस्वरुपी विकणेचा सौदा आमचे अशिल यांच्याशी केला आहे. व बयाणा रक्कम ही स्विकारली आहे.

आमचे अशिलांना सदर बखळ प्लॉट खरेदीचा व्यवहार लवकरच पूर्ण करावयाचा आहे. तरी सदर बखळ प्लॉटच्या बाबतीत या व्यतिरिक्त इतर कोणाचे ही कोणतेही सरकारी, निमसरकारी, संस्था, वित्तीय संस्था, बँका व इतर कोणाचाही खाजगी हक्क, अधिकार, गहाण, टांच, बक्षिस, बोजा, लीज, सौदा, करार, मुखत्यार, मृत्यूपत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा तबदिलीचा व्यवहार असल्यास सदर बखळ प्लॉट वर कोणत्याही प्रकारे हिस्सा, अधिकार असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १० दहा दिवसांच्या आत खालील पत्त्यावर बखळ प्लॉट संबंधीत मुळ कागदोपत्री पुराव्यानिशी व त्याचे झेरॉक्स प्रती जोडून लेखी स्वरुपात हरकतीसह प्रत्यक्ष भेटून आपली हरकत नोंदवावी. तोंडी हरकत अथवा परस्पर वर्तमानपत्रात जाहीर हरकत नोटीस दिल्यास सदरचे हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. वरील मुदतीत कोणाची काहीही एक हरकत न असल्यास सदरची बखळ प्लॉट निर्बोज व निर्वेध समजण्यात येईल व आमचे अशिल त्यांचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, त्यानंतर मात्र कोणाची हरकत आल्यास ती आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.

सदरची नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्राच्या व माहितीवरुन व सांगणेवरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे.

ठिकाण : धुळे, दि. २६/०४/२०२६.

**ॲड.चेतन महादु यादव**
सि.स.नं.२५९७/अ, श्रीसदगुरू सदन, गल्ली नं.५, मिरच्या मारुती चौक, धुळे –४२४००१
मो.९६८९१२४६९२



## NAME CHANGE

My Previous Name Was **AAFRIN ARASHAD ALI SAIYYAD** And My New Name is **AFRIN BI ARSHAD ALI SAIYAD** Add:- Gandhlipura Near Masjid Amalner Dist : Jalgaon-425401 Maharashtra



## जाहीर नोटीस (टायटल व्हेरिफिकेशन नोटीस)

तमाम लोकांना, बँकांना, पतसंस्था, सहकारी संस्था व इतर सर्वांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार श्री. चेतन काशिनाथ पाटील रा. प्लॉट नं. ५७, हुडको कॉलनी, दोंडाईचा ता. शिंदखेडा जि. धुळे यांनी श्री. कल्याण मदनलाल अग्रवाल रा. जैन मंदिराजवळ, दोंडाईचा ता. शिंदखेडा जि. धुळे यांच्या मालकीची मौजे दोंडाईचा ता. शिंदखेडा जि. धुळे येथील स. नं. ४८ पैकी प्लॉट नं. ८७ क्षेत्र १८१.१० चौ. मी. व प्लॉट नं. ११२ क्षेत्र १९५.८७ चौ. मी. हे बिनशेती रहिवासी प्लॉट मिळकती यांच्या चतु:सिमा महसूली रेकॉर्ड ऑफ राईट प्रमाणे सदरहू दोन्ही मिळकत नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेण्याचा सौदा केलेला असून आमचे पक्षकार या सौद्यापोटी ठरलेल्या रक्कमेचा भरणा करुन लवकरच नोंदणीकृत खरेदीखत करणार आहेत.

त्याअर्थी तमाम लोकांना या नोटनीसीद्वारे सुचित करण्यात येते की, श्री. कल्याण मदनलाल अग्रवाल रा. जैन मंदिराजवळ, दोंडाईचा ता. शिंदखेडा जि. धुळे यांच्या मालकीची मौजे दोंडाईचा ता. शिंदखेडा जि. धुळे येथील स. नं. ४८ पैकी प्लॉट नं. ८७ क्षेत्र १८१.१० चौ. मी. व प्लॉट नं. ११२ क्षेत्र १९५.८७ चौ. मी. या मिळकतीवर कोणाचा हक्क, अधिकार, कर्ज, बोजा, तारण, गहाण, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, न्यायालयीन वादविवाद, न्यायालयीन मनाई हुकूम, कायदेशीर टाच, दरखास्त अथवा अन्य प्रकारे कुठलाही हितसंबं असल्यास अश्या व्यक्तींनी, संस्थांनी, बँकांनी त्यांच्याकडील उपलब्ध असलेले कायदेशीर कागदोपत्री पुराव्यासह सदरहू जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा दिवसाच्या आत आमचे खालील दिलेल्या पत्त्यावर संपर्क करुन लेखी हरकत नोंदवावी.

सदरहू नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दहा दिवसांच्या आत कोणाची काही एक कागदोपत्री पुराव्यासह हरकत न आल्यास आमचे पक्षकार लवकरात लवकर वर नमूद मिळकतीचे दुय्यम निबंधक सो. शिंदखेडा यांचे कार्यालयात नोंदणीकृत खरेदीखत लिहून सौदा पूर्ण करतील याची नोंद घ्यावी. मुदतीत न आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व त्यानंतर आमचे पक्षकार सदरहू मिळकती बाबतच्या मागील कोणत्याही तक्रारीस बांधील राहणार नाही.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली आहे. दि. २६/०४/२०२६

**ॲड.प्रमोद एस.मराठे** मो.नं. ८६०५७३८७५६
पत्ता : महादेवपुरा, दोंडाईचा ता. शिंदखेडा जि. धुळे. ४२५४०८



## जाहीर नोटीस

तमाम जनतेस तसेच सर्व वित्तीय संस्था, बँका, पतसंस्था व सर्व संबंधितांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे वडजाई शिवारातील पो. तु. ता. जि. धुळे येथील गट क्रमांक व उपविभाग नं. ७३/१ भुधारण पद्धती भोगवटदार वर्ग-१ चे एकूण क्षेत्र एकक हे. आर. २.३८.०० पैकी श्री. प्रकाश भास्कर भामरे रा. मु. पो. माजीवाडा, ठाणे वेस्ट यांचे मालकी व कब्जे उपभोगातील क्षेत्र अ) लागवड योग्य जिरायत १.२९.०० ब) पोटखराब क्षेत्र ०.०२.०० एकूण क्षेत्र १ हे. ३१.०० आर. आकारणी ६.६१ ही शेत जमीन आहे. त्यासी चतु:सिमा रेकार्ड नकाशा प्रमाणे असे श्री. प्रकाश भास्कर भामरे यांनी वर नमूद मिळकत आमचे अशिल १) मोहम्मद जावीद मोहम्मद शाबान अन्सारी आणि २) फैसल हाजी मुश्ताक अन्सारी रा. धुळे यांना कायम खरेदीने विक्री देणेबाबत टोकन रक्कम स्वीकारुन सौदा केलेला आहे.

आमचे अशिल लवकरच सदर मिळकतीचा खरेदीचा पुढील व्यवहार पूर्ण करणार आहेत. तरी उपरोक्त नमूद वर्णनाच्या मिळकतीत कोणाचेही कुठल्याही स्वरुपाचे जसे सौदा, करार, बक्षीस, अदलाबदल, गहाण, लीज, लीन, लिव्ह ॲण्ड लायसन्स, भाडेपट्टा, वारस हक्क, मुखत्यारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट, बोजे, ऋणभार, ताबा, आरक्षण, जप्ती, कुळ, खरेदी-विक्री आदी व्यवहार तसेच न्यायिक व इतर प्रकरणे अथवा इतर कोणत्याही स्वरुपाचे हक्क व अधिकार असतील तर त्यांनी प्रस्तुत नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आंत खालील नमूद पत्त्यावर पुराव्यानिशी व कायदेशीर कागदपत्रांसह लेखी हरकती आमच्याकडे नोंदवाव्यात. उक्त मुदतीनंतर आलेल्या हरकती व तक्रारी, परस्पर वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेल्या हरकती तसेच फोनवर घेतलेली हरकत ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. दिलेल्या मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त ना झाल्यास सदर मिळकत आमचे अशिलांनी खरेदी करण्यास कोणाचीही काही एक हरकत नाही, तसेच सदर मिळकत निर्बोज व हस्तांतरणीय आहे, असे गृहीत धरुन ठरलेल्या सौद्यानुसार आमचे अशिल सदर मिळकत खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील, याची नोंद घ्यावी.

सदरची जाहीर नोटीस पक्षकाराने दिलेल्या कागदपत्र व अधिकारावरुन आमचे मार्फत प्रसिद्धीस दिली असे. कळावे. धुळे दि. २६/०४/२०२६

**ॲड.नदीम एम.अन्सारी** (ॲडव्होकेट ॲण्ड नोटरी)
धुळे जिल्हा न्यायालय, धुळे.
ऑफिस : ६१, गफुर नगर, वडजई रोड, धुळे ता. जि. धुळे, (महाराष्ट्र)
मो.९८२३७८७०५३

पान १ वरुन

## जेवणावळीतील गोळीबार

हल्ला एखाद्या मोठ्या आंतरराष्ट्रीय कटाचा भाग वाटत नसून, एका माथेफिरू व्यक्तीने केलेले हे कृत्य असावे. तो एकटाच काम करत होता, असे संकेत मिळत आहेत. सखोल तपासानंतरच पूर्ण सत्य समोर येईल. ट्रम्प यांनी माहिती दिली की, हल्लेखोर हा कॅलिफोर्नियाचा रहिवासी आहे. त्याने अनेक शस्त्रास्त्रांसह सुरक्षा चौकीवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र, सीक्रेट सर्व्हिसच्या जवानांनी जीवाची बाजी लावून त्याला रोखले. सुरक्षा दलांच्या तत्परतेमुळे मोठी जीवितहानी टळली. एका सुरक्षा अधिकाऱ्याला गोळी लागली आहे, पण बुलेटप्रूफ जॅकेटमुळे तो सुरक्षित आहे, असेही ट्रम्प यांनी नमूद केले.

## बांग्ला घुसखोर हाकलणार

मतुआ-नामशूद्र आणि इतर शरणार्थी कुटुंबांना नागरिकत्व, पत्ता आणि सर्व हक्क देण्याची हमी मोदी यांनी दिली. ही मोदींची गॅरंटी आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

**महिलांसाठी मोठी घोषणा**

मोदी यांनी महिलांसाठी मोठी घोषणा करत सांगितले की, भाजप सरकार आल्यास दरवर्षी छत्तीस हजार रुपये महिलांच्या खात्यात जमा केले जातील. अंगणवाडी आणि महिला आरोग्य कर्मचाऱ्यांच्या वेतनातही सुधारणा केली जाईल. भाजपने बंगालमध्ये मुलींना सरकारी नोकऱ्यांमध्ये तेहत्तीस टक्के आरक्षण देण्याचे आश्वासन दिले आहे. यामुळे महिलांना दुहेरी लाभ मिळेल, असे मोदी यांनी सांगितले. मोदी यांनी आपल्या भाषणात ममता बनर्जी सरकारवर तीव्र टीका करत बंगालमध्ये बदलाची गरज असल्याचे सांगितले. आगामी निवडणुकांमध्ये जनतेने भाजपला संधी द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

## महावितरणचा निर्णय रद्द करण्याची..

मुख्यमंत्र्यांना देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महावितरणच्या २५ मार्च २०२५ पुर्वीच्या निर्णयाप्रमाणे २० किलोवॅट पेक्षा कमी भार असलेल्या ग्राहकांना दिवसा उत्पादीत विजेचे चोवीस तास समायोजन किंवा वापराची मुभा होती. त्यापेक्षा जास्त भार असलेल्यांना सायंकाळी सहा ते रात्री दहा वगळता अठरा तास अपारंपारिक ऊर्जा वापरण्याची मुभा आणि या नियमाची वीस वर्षे शाश्वत हमी होती. पण, आता ही मर्यादा सात सात म्हणजे सकाळी नऊ ते सायंकाळी पाच अशी आणण्यात आली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील उद्योग व्यवसायांवर मोठा आर्थिक आणि दूरगामी परिणाम होणार आहे. अन्य राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात वीज महाग आहे. अशा स्वरूपाची जाचक नियमावली अन्य राज्यात नाही. आता नवीन नियमामुळे अन्य राज्यातील उद्योग आणि उद्योजकांसोबत स्पर्धा करणे अशक्य होईल. नवीन उद्योग महाराष्ट्रात आकर्षित करणे कठीण होईल. नवीन नियमामुळे तांत्रिक आणि नैसर्गिक न्यायाचे उल्लंघन होत आहे, असे स्पष्ट करीत निवेदनात म्हटले आहे की, सौर ऊर्जा प्रकल्प वीज निर्मिती करताना ग्रीड केवळ सेंसर म्हणून कार्यरत असते. ग्राहक स्वउपभोग घेतो तोपर्यंत रोहित्रावर भार कमी होतो. अतिरिक्त वीज निर्यात करताना महावितरण सुविधांचा वापर होतो. पण, भार वाढत नाही. पुर्वीचे बँकींग चार्ज युनिट स्विकारले गेले. पण, उद्योजकाने कर्ज काढून बसविलेले प्रकल्पाचे एकूण उत्पादनावर ग्रीड सपोर्ट चार्ज लादणे अतिशय जाचक आणि अन्यायकारक आहे. स्वतःची गुंतवणूक आणि शासन पुर्वपरवानगीने निर्माण केलेल्या वीजेवर पुन्हा ग्राहकांकडून शुल्क आकारणे अन्यायकारक व नैसर्गिक न्यायाच्या विरूध्द आहे.

उद्योगांना दिलासा देण्यासाठी महावितरणचा २५ मार्च २०२६ चा निर्णय तात्काळ रद्द करण्यात यावा. पुर्वीची वीस वर्षे हमी आणि चोवीस तास समायोजनाची मुभा कायम ठेवा. ग्रीड सपोर्ट चार्ज आणि क्षमता हटवा. ग्राहकाभिमुख धोरण जाहीर करा आणि उद्योगांना दिलासा द्या. सौर ऊर्जा ग्राहक शुल्क निश्चिती समिती मध्ये सौर ऊर्जा ग्राहक प्रतिनिधी, खासगी वीज तज्ज्ञ व उद्यो प्रतिनिघी यांचा समावेश करावा. केवळ महावितरणचे अधिकारी असल्याने निष्पक्ष निर्णय घेण्यावर बंधने येतील, अशा मागण्या या निवेदनात करण्यात आल्या आहेत. निवेदन देताना सौर वीज ग्राहक संघटनेचे डॉ. महेश घुगरी, कैलास अग्रवाल, प्रकाश पाटील, नितीन सिंघवी, किशोर पोतदार, वर्धमान सिंघवी उपस्थित होते.

## रस्ते, पुलांची कामे रखडली

चिन्हे नाहीत. पावसाळ्यात तापी नदीच्या बॅक वॉटरमुळे गोमाई पात्रात पाणी साचते, अशा वेळी पर्यायी मार्ग बंद झाल्यास अवजड वाहतुकीला २५ किमीचा फेरा मारून प्रकाशा-काथर्दे मार्गे जावे लागेल.शहादा शहराजवळील तिखोरा गावाजवळील पुलाचे काम अत्यंत संथगतीने सुरू आहे. यामुळे ५० ते ६० गावांचा संपर्क तुटला आहे. तिखोरा ते उंटावद दरम्यानचा छोटा पूलही धोकादायक झाला आहे. तसेच वैजाली ते नांदर्डे येथील वाकी नदीवरील पूल दोन वर्षांपासून जमीनदोस्त झाला असून त्याचे काम अद्याप सुरू न झाल्याने नागरिकांना ३० किमीचा फेरा मारून शहादा गाठावे लागत आहे. केवळ प्रकाशा येथील नवीन पुलाचे काम पूर्ण झाले असले तरी उद्घाटनाअभावी तेथेही अवजड वाहतूक बंदच आहे. तसेच शहादा-कहाटूळ रस्ता पूर्णपणे उध्वस्त झाला असून मोहिदा ते कहाटूळ दरम्यान मोठ्या खड्ड्यांमुळे वाहन चालवणे कठीण झाले आहे. या रस्त्यासाठी विद्यार्थ्यांनी यापूर्वी आंदोलन केले होते, मात्र अद्याप दुरुस्ती झालेली नाही. तिखोरा ते पाडलदा रस्ता अवजड वाहतुकीमुळे खराब झाला असून तेथे निकृष्ट दर्जाचे पॅचवर्क करण्यात आले आहे.भादे ते काथर्दे आणि पाडळदा ते चिखली रस्त्यांची हीच अवस्था असून पावसाळ्यात अपघातांचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

## डासांच्या प्रादुर्भावाने नागरिक त्रस्त

आमच्यासाठी महत्त्वाचे असून, फवारणी करताना कोणताही भेदभाव केला जाणार नाही. संपूर्ण शहरात ही मोहीम राबवली जाईल. आपापल्या प्रभागात नगरसेवकांनी सहकार्य करून फवारणी करून घ्यावी व नागरिकांनी नगरपालिका प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन आरोग्य सभापती सुनील काशिनाथ पाटील यांनी केले आहे.दरम्यान, नवीन वसाहतींमधील मोकळ्या प्लॉटमध्ये सांडपाणी साचल्याने डासांचे प्रमाण वाढले आहे. प्लॉट धारकांनी स्वतःहून झाडे व झुडपे काढून घेण्याबाबत पालिकेने यापूर्वीच सूचना दिल्या आहेत. मोकळ्या प्लॉटमध्ये सांडपाणी सोडणाऱ्यांवर आणि अस्वच्छता ठेवणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा मुख्याधिकारी साजिद पिंजारी यांनी दिला आहे.

## सेंट्रल लायब्ररीस मुख्यमंत्र्यांची सदिच्छा भेट

आलेल्या अत्याधुनिक शैक्षणिक सुविधा, सेंट्रल लायब्ररी तसेच नव्याने सुरू करण्यात आलेल्या आधुनिक रुग्णालयामुळे सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या प्रमाणात लाभ होत आहे, असे त्यांनी सांगितले. तत्पूर्वी मुख्यमंत्री फडणवीस यांनी आमदार पावरा यांच्या संपर्क कार्यालयास भेट दिली.

## नंदुरबारचा पारा चौरेचाळीस अंशावर

यासाठी आवश्यक औषधसाठा उपलब्ध करण्यात आला आहे. तसेच डॉक्टर आणि नर्सेस यांचीही नेमणूक करण्यात आली आहे. तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता लक्षात घेता प्रशासनाने नागरिकांना विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. दुपारच्या वेळेत अत्यावश्यक कामाशिवाय बाहेर पडू नये, पुरेसे पाणी प्यावे आणि हलके कपडे परिधान करावेत, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्याची माहिती जिल्हा प्रशासनाने दैनिक आपला महाराष्ट्र शी बोलतांना दिली आहे.

## शिक्षिकेवर चाकु हल्ला

नकार दिल्याचा राग आल्याने फैसल ऊर्फ राजु खलील शाह याने शिक्षिकेला शिवीगाळ करत मारहाण केली. तसेच हातातील धारदार चाकुने प्राणघातक हल्ला केला. दोन्ही हातांवर, चेहऱ्यावर चाकुने वार करून गंभीर दुखापत केली. जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी चाळीसगाव रोड पोलीस स्टेशनला फैसल ऊर्फ राजु खलील शहा विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# एसटीच्या विलीनीकरणाबाबत सरकार गप्प का?
# तेलंगणात जमले ते महाराष्ट्रात का नाही : वडेट्टीवार



**मुंबई, दि.२६- महाविकास आघाडी सत्तेत असताना गोपीचंद पडळकर, सदावर्ते यांना हाताशी धरून एसटी कर्मचाऱ्यांचा संप करण्यात आला होता. जे महायुती सरकारला जमले नाही ते तेलंगणा सरकारने करून दाखवले आहे. तेलंगणा सरकारने एसटीचे विलीनीकरण केले. कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य केल्या. त्यांच्या कामाच्या वेळा कमी केल्या. पगारवाढ दिली. नोकरीत नियमितीकरण केले. महाराष्ट्रात हे का होऊ शकत नाही, अशी विचारणा काँग्रेस विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.**

महाराष्ट्रात महायुतीचे सरकार असताना विलीनीकरणाच्या मागणीवर भाजपाचा घसा का कोरडा झाला. एसटी ही ग्रामीण भागाची जीवनवाहिनी आहे. विरोधी पक्षात असताना एसटीच्या विलीनीकरणासाठी जे ओरडत होते, ते आता सत्तेत आल्यावर मूग गिळून गप्प का आहेत? सत्तेची ऊब मिळाल्यावर भाजपला एसटी कामगारांच्या संघर्षाचा विसर पडला आहे, अशी टीका वडेट्टीवार यांनी केली. राज्यातील महायुती सरकार महापुरुषांचा अवमान करणाऱ्यांना अभय देण्यासाठी सत्तेत बसले आहे काय? ज्याला महाराष्ट्राचा इतिहास माहित नाही, ज्याची अक्कल कवडीची आहे, अशा भोंदू माणसाने महाराजांवर भाष्य करण्याची हिंमत कशी केली? छत्रपती शिवाजी महाराज कोणापुढे झुकले असते तर स्वराज्य निर्माण झाले नसते. सत्तेत बसलेले लोक या बाबांच्या पायाशी लोळण घेतात. म्हणूनच या भोंदूंची मस्ती वाढली आहे आणि ते महाराजांचा अपमान करतात. जेव्हा या भोंदूने महाराजांचा अपमान केला तेव्हाच मुख्यमंत्र्यांनी का थांबवले नाही? नंतर बोलून उपयोग नाही. तसेच संजय गायकवाड सारखे शिवप्रेमी आता कोणत्या बिळात लपून बसले आहेत? आता का बोलत नाहीत, शिव्या देत नाहीत, असा सवाल वडेट्टीवार यांनी केला.




# सिव्हिल सर्जन डॉ.रवी सोनवणे यांना समाजसेवक पुरस्कार

**धुळे, दि.२६- धुळे जिल्हा रुग्णालयाचे सिव्हिल सर्जन डॉ.रवी सोनवणे यांना निसर्ग समितीतर्फे प्रतिष्ठेचा डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजसेवक पुरस्कार प्रदान करण्यात आला. धुळे पंचायत समिती येथे आयोजित सन्मान सोहळा निवृत्त न्यायाधीश जे. टी. देसले यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. कार्यक्रमाला महापौर मायादेवी परदेशी यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.**

समाजसेवा, आरोग्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य आणि जनतेसाठी केलेल्या योगदानाची दखल घेत डॉ.सोनवणे यांना हा सन्मान देण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांनाही डॉ. आंबेडकर समाजसेवक पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यात डॉ. तुषार शेवाळे, शुभांगी पाटील, विठ्ठलराव घुगे, शशिकांत भदाणे, ललित माळी, डॉ.राहुल महिरे, डॉ.निशा महाजन, ॲड. एम. एस. पाटील, विनायक अहिरे, प्रा.विलास चव्हाण, देविदास जगताप आदींचा समावेश होता. कार्यक्रमास माजी आमदार डॉ. शरद पाटील, उपमहापौर ज्योत्सना पाटील, महादेव परदेशी, राज्य उपाध्यक्ष किशोर डियालाणी, निसर्ग मित्र समितीचे संस्थापक डॉ. प्रेमकुमार अहिरे, जिल्हा उपाध्यक्ष विलासराव देसले, जिल्हा कार्याध्यक्ष राजेंद्र भदाणे, मधुकर निकुंभे आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सुनिता गरूड, प्रभाकर पवार, डॉ.सुनंद भामरे यांचे सहकार्य लाभले. नियोजन समितीचे सचिव व्ही.टी. गवळे, उपाध्यक्ष प्रा.डॉ.जयवंत भामरे, कोषाध्यक्ष नामदेवराव तुपे यांच्यासह सर्व पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन संतोषराव पाटील यांनी केले, प्रास्ताविक डी.बी. पाटील यांनी मांडले, तर आभार प्रदर्शन व्ही. टी. गवळे यांनी मानले.

पान १ वरुन

## आपली बस-आपली सेवा

अनुभव ठरेल, असे प्रतिपादन परिवहन मंत्री तथा महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

या अभियानांतर्गत चालक आणि वाहक हे केवळ कर्मचारी न राहता सेवक बनणार आहेत. बस ताफ्यात समाविष्ट करण्यापूर्वी तिची स्वच्छता, वेळेआधी फलाटावर उपस्थिती, नीटनेटका गणवेश आणि शिस्तबद्ध वर्तन यांना आता केवळ नियमांची चौकट नसून, सेवाभावाची ओळख मानली जाणार आहे. बस सुटण्यापूर्वी चालकाने स्वत:ची ओळख करून देत प्रवाशांना प्रवासाचा मार्ग, थांबे आणि अपेक्षित वेळ याची माहिती देणे हा केवळ औपचारिक भाग नसून, प्रवाशांशी नाते जोडण्याचा एक सुसंवादी प्रयत्न असेल. प्रवासा दरम्यान मदतीचा हात पुढे करणारा चालक-वाहक हा एसटीचा खरा चेहरा ठरेल. या अभियानात प्रवाशांनाही समान सहभागाचे आवाहन करण्यात आले आहे. स्वच्छता राखणे, मौल्यवान वस्तूंची जबाबदारी स्वत: घेणे, तसेच मोठे सामान योग्य ठिकाणी ठेवणे या साध्या सवयी प्रवास अधिक सुखकर बनवतील. तसेच एनसीएमसी स्मार्ट कार्डचा वापर आणि ऑनलाईन आरक्षणाचा स्विकार ही आधुनिकतेकडे टाकलेली पावले ठरतील.

**अडचणीतही आधार, सेवेत सातत्य**

बस रद्द होणे किंवा मार्गात अडथळे निर्माण होणे या अनपेक्षित परिस्थितींमध्ये प्रवाशांना तत्काळ पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. बसस्थानके आणि परिसर स्वच्छ, सुरक्षित आणि सुसज्ज ठेवण्याची जबाबदारी संबंधित अधिकाऱ्यांवर निश्चित करण्यात आली आहे. प्रवाशांच्या तक्रारींना केवळ नोंद न मानता, त्यांचे तत्काळ निराकरण करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात येणार आहे. प्रत्येक स्तरावर नियमित आढावा घेत, सेवेतील उणिवा दूर करण्यावर भर दिला जाणार आहे.

## भोंदू अशोक खरातचा भांडाफोड

पगारही ललित पोफळे देत असत. याच स्वयंपाकीने फार्म हाऊसवर खरातच्या कुकर्मांचे पुरावे गोळा केले आहेत. हे पुरावे आता एसआयटीच्या हाती लागले आहेत.

आजवर खरात याच्या लैंगिक शोषणाचे जे व्हीडीओ समोर आले ते त्याच्या नाशिक येथील कॅनडा कॉर्नर परिसरातील ओकस कार्यालयात छुप्या कॅमेऱ्यातील होते. मात्र, खरात फार्म हाऊसवर देखील पीडित महिलांना नेत असल्याचे समोर आले आहे. या स्वयंपाकीची ड्युटी फार्म हाऊसवर होती. फार्म हाऊसवर महिलांना आणले की, खरात हा स्वयंपाकीस सीसीटीव्ही कॅमेरे बंद करण्यासाठी सांगत असे. परंतु, हा स्वयंपाकी कॅमेरे बंद करीत नसे. खरातचा एकेकाळचा विश्वासू ललित पोफळे याने जी फिर्याद खरातच्या विरोधात दाखल केली त्यात स्वयंपाकीबाबतचा हा धक्कादायक खुलासा केला आहे.

खरात जेव्हा थकत असे, तेव्हा फार्म हाऊसवर किमान दोन रात्र थांबत असे. रात्री काही महिलांसोबत आतमध्ये दारू पीत असे. त्यांच्यासोबत अश्लील चाळे करीत असे. हे सर्व तेथील सीसीटीव्हीत कैद झाले आहे, असे पोफळे याने फिर्यादीत म्हटले आहे. हे सारे बिंग पोफळे यांनीच खरातकडे पाठविलेल्या स्वयंपाकी मुळे फुटले आहे. भोंदू अशोक खरातचा विश्वासू म्हणून ललित पोफळेची ओळख होती. मीरगाव येथील शिवनिका संस्थानच्या कार्यकारिणीवर संचालक राहिलेले ललित प्रकाश पोफळे (रा. वरळी) हे खरातचे सीएही होते. परंतु खरात पूजाविधीच्या नावाखाली हातचलाखीने पेटीतून नाग काढून बनाव रचत होता. खरातच्या या अनैतिक कृत्यांचा व्हीडीओ असलेला पेनड्राईव्ह पोफळेंच्या हाती लागला होता. खरातने पोफळे यांनाही आठ कोटींचा चुना लावला. त्यानंतर खरातच्या दैवी चमत्कारांबद्दलचा त्यांचा विश्वास उडाला. त्यांनी त्यानंतर शिवनिका संस्थानवरील विश्वस्तपदावरून स्वत:ला दूर केले होते.

**मुंबईमध्ये झाली बैठक**

त्यानंतर खरातचे भक्त असलेले राजेंद्र जासूद, दिनेश परब हे पोफळेंच्या संपर्कात आले. त्यांनाही खरातचा खरा चेहरा माहिती झाला. त्याच कालावधीत खरातने ऑफिसबॉयच्या पत्नीवर अत्याचार केले असल्याचे समजले. खरातचे अनैतिक कृत्य उघड करून त्याला कायदेशीर शिक्षा कशी देता येईल, याबाबत पोफळेंच्या मुंबईतील घरी राजेंद्र जासूद, दिनेश परब यांच्यासोबत अनेकवेळा बैठका झाल्या. एकदा पोफळेंना दिनेश परबने सांगितले की, ऑफिसबॉयने खरातच्या ऑफिसमध्ये स्पाय कॅमेरा लावलेला आहे. स्पाय कॅमेऱ्याच्या व्हीडीओमुळे खरातचे कारनामे पुढे येणार होते. त्यामुळे सर्वांचा ऑफिसबॉयला पाठिंबा होता. कालांतराने ऑफिसबॉयकडून कॅमेरा घेऊन एकाने त्यातील व्हीडीओ शिर्डी पोलिसांना दिले.

## रमेश दाणेंची फेरनिवड

काकडे, शेख हुसेन, प्रशांत गावंडे, डॉ.शिवचरणसिंह ठाकूर, बबनराव कानकिरड, महादेवराव भुईभार, मधुकर शिरसाठ, बजरंग सोनवणे यांनी आपले विचार यावेळी बोलताना व्यक्त केले. अधिवेशनात महाराष्ट्रातील बावीस जिल्ह्यातील लोकसेवक प्रतिनिधी उपस्थित होते. अनेक जिल्ह्यातील सदस्यांनी रमेश दाणे यांचे अभिनंदन केले.

### निधन वार्ता

## हिरामण सावळे



शहादा, दि.२६- खेडदिगर येथील माजी पोलीस पाटील हिरामण कौतिक सावळे वय (७४) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, चार मुली, सुना, जावाई, नातंवडे असा परिवार आहे. ते किरण सावळे व श्याम सावळे यांचे वडील होत.

## मोतनबाई सोलंकी

शहादा, दि.२६- शहरातील रामदेवबाबा नगर मधील रहिवासी गं.भा.मोतनबेन सोमजी सोलंकी हाटमोहीदेकर यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८२ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार असून त्या रविंद्र सोमजी सोलंकी व संजय सोमजी सोलंकी यांच्या आई तर सामाजिक कार्यकर्ते नारायण नथ्थू सोनवणे व गिरधर नथ्थू सोनवणे यांची बहिण होत.

भाड्याने देणे आहे
४ रुम स्वतंत्र संडास बाथरुम असे देणे आहे.
-: संपर्क :-
9270308750



**नंदुरबार येथील संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन मार्फत मानव एकता दिवस निमित्त रक्तदान जनजागृती करण्यासाठी काढण्यात आलेली दुचाकी रॅली. या रॅलीत संत निरंकारी परिवाराचे सदस्य सहभागी झाले होते. रक्तदान संदर्भात जनजागृती पर घोषवाक्य देण्यात आले. संत निरंकारी भवन पासून रॅलीच्या शुभारंभ झाला होता शहरातील प्रमुख मार्गावरून रॅली काढण्यात आली.**

## वणीत वाचनालयाची अज्ञातांकडून तोडफोड

**धुळे, दि. २६ : पुस्तक वाचन दिन साजरा करून दोन दिवस होत नाही तोच धुळे तालुक्यातील वणी येथे समाजकंटकांनी वाचनालयाची तोडफोड करीत पुस्तके फाडली. याबाबत गावातील सामाजिक कार्यकर्ते चुडामण आत्माराम पाटील यांनी धुळे तालुका पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी अज्ञातांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.**

धुळे तालुक्यातील वणी येथे अनेक तरूण स्पर्धा परिक्षांचा आणि पोलिस भरतीची तयारी करीत आहेत. पण, या तरूणांना अभ्यासासाठी धुळ्यातील वाचनालये किंवा खासगी शिकवणी वर्गात जावे लागते. गावातील सर्वच तरूणांची धुळ्यात येऊन अभ्यास करण्याची आर्थिक परिस्थिती नाही. त्यामुळे गावातील संवेदनशील शेतकरी चुडामण पाटील यांनी जिल्हा परिषदेच्या जुन्या इमारतीतील एका खोलीत वाचनालय साकारण्याची संकल्पना मांडली. त्याला ग्रामपंचायत आणि जिल्हा परिषदेने साकारात्मक प्रतिसाद दिला. त्यानंतर चुडामण पाटील यांनी पदरमोड करीत काही हजार रूपये खर्च केले. खोलीची सुधारणा केली. खोलीत तरूणांना वाचन करणे सहज श्नय होईल असे फर्निचर, खुर्ची आणल्या. चार महिन्यांपासून यशाची स्वप्ने पहात अनेक तरूणांनी अभ्यास सुरू केला. पण, शनिवारी रात्री काही समाजकंटकांनी वाचनालयात फर्निचरची तोडफोड केली आणि पुस्तके फाडली. समाजकंटकांनी हे कृत्य का, कशासाठी आणि कोणाच्या मार्गदर्शनात केले, या प्रश्नांनी अभ्यास करणाऱ्या तरूणांना चिंताग्रस्त केले आहे.

# शिंदखेडा येथे शिवसेनेची आढावा बैठक उत्साहात संपन्न

**शिंदखेडा, दि.२६ (प्रतिनिधी)- शिंदखेडा येथे शिवसेनेची आढावा बैठक उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. बैठकीची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. याप्रसंगी भाऊसाहेब चौधरी यांनी मार्गदर्शन करताना पक्षात नव्याने प्रवेश केलेल्या मान्यवरांच्या अनुभवाचा पक्षाला निश्चितच लाभ होईल, असा विश्वास व्यक्त केला.**

ते पुढे म्हणाले की, आगामी निवडणुकांसाठी आतापासूनच तयारीला लागणे गरजेचे असून प्रत्येक बूथवर बूथ प्रमुखांची नियुक्ती करणे आणि बीएलए यंत्रणेवर विशेष लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. तसेच प्रकाश चौधरी यांनी आपल्या राजकीय प्रवासाचा आढावा घेत शिंदखेडा तालुक्यात येत्या काळात १०० शिवसेना शाखा सुरू करण्याचा मानस व्यक्त केला.कार्यक्रमादरम्यान मान्यवरांचा सत्कार आयोजकांच्या वतीने करण्यात आला. या बैठकीस शिवसेनेचे महाराष्ट्र सचिव तथा धुळे जिल्हा लोकसभा संपर्कप्रमुख भाऊसाहेब चौधरी, जिल्हाप्रमुख मनोज मोरे, तालुकाप्रमुख मयूर बोरसे, शहरप्रमुख सोनू वाघ, माउली देवरे,युवा सेना शहरप्रमुख महेंद्र वाडीले, माजी पंचायत समिती सदस्य प्रकाश नाना चौधरी, ज्येष्ठ पत्रकार भालचंद्र पाटील, माजी सैनिक भूषण पवार, सुनील पाटील आदी उपस्थित होते.यावेळी शिंदखेडा तालुक्यातील खानदेश रक्षक ग्रुपचे माजी सैनिक ज्ञानेश्वर गिरासे, प्रमोद गुरव, पांडुरंग पवार, सोमनाथ बडगुजर, कैलास ठाकरे, शांताराम जाधव यांनी अधिकृतरित्या शिवसेनेत प्रवेश केला. तसेच मालपूर येथील गायत्री पाटील,देवी येथील पदमसिंह गिरासे, गुलजारसिंग गिरासे आणि शिंदखेडा येथील बडगुजर समाजाचे उपाध्यक्ष गुलाबराव बडगुजर, रमेश चौधरी, रघुनाथ कोळी यांच्यासह शोभाताई पाटील, उषाताई चौधरी, शीतल चौधरी, वैशाली चौधरी, गायत्री पाटील, कविता बडगुजर यांनीही पक्षप्रवेश केला. सूत्रसंचालन माजी सैनिक भूषण पवार यांनी केले, तर आभार महेंद्र वाडीले यांनी मानले.

## केमिकल कंपनीच्या कार्यालयात मारहाण

धुळे, दि.२६- शिंदखेडा तालुक्यातील बाभळे फाटा परिसरातील स्मार्ट केमिकल कंपनीच्या कार्यालयात घुसून व्यावसायिकास कामगाराने मारहाण करत हाताला चावा घेतल्याची घटना घडली आहे. जितेंद्र हिरामण मराठे (वय ४९) रा.प्रेम नगर जळगाव.यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, बाभळे फाटाजवळील स्मार्ट केमिकल कंपनीच्या कॅबिनमध्ये शिंदखेडा तालुक्यातील बेटावद गावातील विजय नारायण कुंभार यांनी आपल्या कामाचे एक हजार आठशे पंच्याहत्तर रूपये घेण्यासाठी आले. यावेळी फिर्यादीने थोडावेळ थांबण्यास सांगितल्याचा राग आल्याने विजय कुंभार यांनी कॅबिनमध्ये घुसून जितेंद्र मराठे यांना शिवीगाळ करत मारहाण केली व उजव्या हाताला चावा घेतला. गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पाहिजे
हॉटेल कामासाठी मॅनेजर व वेटर पाहिजे. समक्ष भेटा!
हॉटेल राधिका
वाडीभोकररोड, धुळे
8857027090

कार पाहिजे
नागपुर कडे २-३ दिवसांकरीता जाऊन परत येणेसाठी ७/८ सिटर नविन कार भाड्याने पाहिजे.
संपर्क ९४२३९२८९००

घर भाड्याने पाहिजे
गल्ली नं.५ ते ७, जुने धुळे,फुले कॉलनी परिसरात २ ते ३रुमचे संडास बाथरुमची सोय असलेले घर भाड्याने पाहिजे.(वर चालेल)
संपर्क ९४२३९२८९००

कुलिंग इंडिया की पहचान
Symphony
Crompton
आत्ता पर्यंतच्या कुलर्सच्या
तुलनेत सर्वात स्टायलिश मॉडेल्स्'



आता खरेदी करा कूलर ०% EMI वर
BAJAJ FINSERV 0% फायनान्सची सुलभ E.M.I सुविधा उपलब्ध.
नियम व अटी लागू*
ak media- 238222
58 वर्षापासून आपल्या सेवेत...
अधिकृत विक्रेते श्री महावीर इलेक्ट्रीक ॲण्ड टी.व्ही
श्रीराम मंदिराजवळ, फुलवाला चौक, आग्रा रोड, धुळे ▪ फोन: 229162, 235763

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक, हेमंत सुधाकर मदाने यांनी हेमंत प्रिंटींग प्रेस, वीर सावरकर मार्ग, धुळे येथे मुद्रित करुन आपला महाराष्ट्र, जनशक्ती, वीर सावरकर मार्ग, धुळे-४२४००१ येथे प्रकाशित केले. दुरध्वनी मुख्य कार्यालय, धुळे (०२५६२) २३५३९६, २३८३९६, aplamaha@gmail.com नंदुरबार २२३४४४ aplamahashd@gmail.com शहादा-२५६९३९, मालेगाव-२४३१३३६, नाशिक-२५७५९८९, पुणे-९८२३०४६५२२, आपला महाराष्ट्र-रजि.नं.एम.एच.डी.आय.ए.१७ र.नं.११२२२/६०